cmyk

## संपादकीय

### नव्या सरकारला ताळमेळ साधावा लागेल

जम्मू-काश्मीरमध्ये लोकनियुक्त सरकार आले. विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीने स्पष्ट बहुमत प्राप्त केले. चार अपक्ष आमदारांनीही नॅशनल कॉन्फरन्सचा रस्ता धरला आहे. त्यामुळे काँग्रेसने भविष्यात काही त्रास दिला, तरी उमर अब्दुल्ला यांच्या लवकरच स्थापन होणाऱ्या सरकारला कोणता धोका नसेल. लोकशाहीच्या दृष्टीने आणि राज्यातील राजकीय स्थैर्यासाठी ही चांगली गोष्ट आहे. अशांतता असली किंवा राजकीय बजबजपुरी असली की राज्याचा विकास थांबतो. जम्मू-काश्मीर हे विशेष राज्य असल्यामुळे तेथे अस्थैर्याला स्थान देण्यास मुळीच वाव नाही.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### हरियाणात ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याची काँग्रेसची तक्रार

नवी दिल्लीः सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ९ ऑक्टोबर रोजी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी निवडणूक आयोगाला तक्रारींनी भरलेले निवेदन सादर केले होते. यानंतर, आता हरियाणाच्या २० विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेतील गंभीर आणि स्पष्ट अनियमितता अधोरेखित करणारे एक अद्ययावत निवेदन आयोगाला दिले आहे. आम्हाला आशा आहे की निवडणूक आयोग याची दखल घेईल आणि योग्य निर्देश देईल. त्या मशीन्स सील करून तपास पूर्ण होईपर्यंत सुरक्षित ठेवाव्यात, अशी मागणी काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केली आहे.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१७२ | सोमवार, दि.१४ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# सोयाबीन हमीभावाने खरेदीसाठी केंद्रे तातडीने वाढविण्याची गरज; खुल्या बाजारात भाव कमी

**पणे । प्रतिनिधी**

**सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्यासाठी राज्यात आतापर्यंत २५५ खरेदी केंद्रे सुरु झाली. मात्र बाजारात हमिभावापेक्षा कमी भाव असल्याने खरेदी केंद्रे तातडीने वाढविण्याची गरज आहे. तसेच शेतकऱ्यांना वेळेत पेमेंट देण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत.**

सोयाबीनचे भाव पडल्याने देशात महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक आणि तेलंगणा राज्यात हमीभावाने खेरदीला परवानगी दिली. त्यापैकी महाराष्ट्रात सोयाबीनची हमीभावाने १३ लाख टनांची खरेदी होणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात १० लाख टन खरेदी होणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांची नोंदणी १ ऑक्टोबरपासून सुरु झाली. तर प्रत्यक्ष खरेदी १५ ऑक्टोबरपासून सुरु होणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने तयारी केली असून नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यामातून ही खरेदी होणार आहे. राज्यात आतापर्यंत सोयाबीन ◀◀ पान २ वर



### शेतकऱ्यांची नोंदणी

केंद्र सरकारने हमीभावाने शेतीमालाची खरेदी करताना शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी ई-समृध्दी पोर्टल तयार केले. पण ई-समृध्दी पोर्टलवर सोयाबीन पिकाचा समावेशच करण्यात आला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना स्वतः नोंदणी करता येत नाही. शेतकऱ्यांनी आपला आधार नंबर, बँक तपशील आणि सातबारासह खरेदी केंद्रावर नोंदणी करावी, असे सरकारने सांगितले. खरेदी केंद्र चालक शेतकऱ्यांची नोंदणी ई-समृध्दी पोर्टलवर करणार आहेत.

### राज्य सरकार आधी पेमेंट करणार

नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यामातून सोयाबीनची खरेदी होणार आहे. मात्र खरेदी केंद्रांनी माल खरेदी केल्यानंतर तो नाफेडच्या सेंटवर जाऊन पेमेंट येण्यासाठी किमान ८ ते १० दिवस लागतात. काही वेळा जास्त वेळ लागतो. परिणामी शेतकरी नाफेडला माल घालण्याऐवजी खुल्या बाजारात कमी भावात माल विकतात. पण शेतकऱ्यांना वेळेत पेमेंट करण्यासाठी राज्य सरकारने १०० कोटींची तरतूद केल्याची माहिती आहे. पण ही रक्कम प्रत्यक्ष देत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांना वेळेत पेमेंट मिळणार नाही. सरकारने १०० कोटी दिल्यास शेतकऱ्यांना ४ ते ५ दिवसांमध्ये पेमेंट मिळू शकते, असे काही खरेदी केंद्र चालकांनी सांगितले.

### जहागीरदाराची आवलाद आली तरी झुकायचे नाही

# न्याय मिळत नाही, यावेळी हिशोब करावाच लागणार

## नारायण गडावरील दसरा मेळाव्यातून जरांगे पाटलांचा इशारा



**नारायणगड । प्रतिनिधी**

नारायण गडावर आलेला समुदाय संस्कारित आहे, कधी जातीवाद केला नाही, प्रत्येकाला सांभाळून घेण्याचे काम ा समुदायाने केला आहे. तरीही आम्हाला न्या मिळत नाही, त्यामुळे यावेळी आपल्याला हिशोब करावाच लागेल असा निर्धार करीत ते म्हणाले, आमच्या नादि लागू नका, आम्ही झुकणार नाहीत, यावेळी उलथा पालथ करावीच लागेल, असा निर्धार मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी नारायण गडावरील दसरा मेळाव्यातून केला.

नारायणगडावर होत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या ◀◀ पान २ वर

### १४ महिन्यांपासून आरक्षणासाठी झुंज

जरांगे पाटील म्हणाले की, गोरगरीब मराठ्यांना आरक्षण द्या ही मागणी केली जात आहे. इथे जातीचा संबंध नाही. प्रत्येक जातीने राज्य आणि केंद्राची सुविधा घेतली. आम्ही १४ महिन्यांपासून आरक्षणासाठी झुंजत आहोत. तुमच्यामुळे आरक्षणाला धक्का लागत आहे, असे काहीजण सांगत आहेत. आता १५ जातींचा सहभाग केला आता धक्का नाही का लागला? असा सवालही त्यांनी केला.

# महाप्रचंड..! भगवान भक्तीगडावर जनसागर

## आ.पंकजाताई मुंडेंच्या तडाखेबंद भाषणातून मिळाली सर्व सामान्यांना उर्जा

**पाटोदा । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांचा भगवान भक्तीगडावरील आजचा दसरा मेळावा दरवर्षीच्या परपंरेनुसार ऐतिहासिक असाच ठरला. यंदा मेळाव्यास अतिविराट जनसागर उसळला होता, मागील सर्व रेकॉर्ड गर्दीने मोडून काढले. कोयते घासून ठेवा, लवकरच महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात येणार आहे, ऊसतोड मजूरांचे आयुष्य बदलल्याशिवाय शांत बसणार नाही असं ठणकावून सांगत वंचितांना, पिडितांना, दलितांना, गरिबांना त्रास दिला तर त्याचा हिशेब केल्याशिवाय राहणार नाही. असा इशारा आ. पंकजाताईंनी यावेळी दिला.



राष्ट्रसंत भगवानबाबा यांचे जन्मगाव असलेल्या सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर आज पारंपारिक व ऐतिहासिक दसरा मेळावा मोठया उत्साहात पार पडला. हा मेळावा अतिविशाल गर्दीने व लाखोंच्या संख्येने आलेल्या समर्थकांमुळे महाप्रचंड असा झाला. या मेळाव्याला आ. पंकजाताई मुंडे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, माजी खासदार डॉ .प्रीतमताई मुंडे , आर्यमन पालवे, डॉ.सुजय विखे, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके, ◀◀ पान २ वर

# बीडमधून डॉ.क्षीरसागर यांना उमेदवारीचे पार्थ पवारांकडून संकेत

### ताकदीने कामाला लागण्याच्या सूचना; डॉ.क्षीरसागर व समर्थकांकडून पवारांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांना उमेदवारी मिळणार असल्याचे संकेत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे सुपूत्र व पक्षाचे युवा नेते पार्थ अजित पवार यांच्याकडून मिळाले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. बारामती येथे शनिवारी विजयादशमीनिमित्त स्नेहमिलन सोहळ्यात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह समर्थकांनी ◀◀ पान २ वर



# कोणीही भगवान गडाच्या मेळाव्याची पवित्रता संपवू शकत नाही

### जरांगे पाटलांच्या मेळाव्यावर धनंजय मुंडेची टीका



**पाटोदा। प्रतिनिधी**

काही जणांनी मला विचारले, म्हटले मला आनंद आहे. ज्याला दसरा माहिती त्याला प्रभू श्रीराम पण माहिती पाहिजे. पुढचे मी बोलणार नाही तुम्ही समजून घ्या. अनेक वेळा संकटाच्या काळात गोपीनाथ मुंडे साहेबांपासून पंकजा मुंडेपर्यंत तुम्ही माझ्या बहिणीच्या पाठीमागे उभे राहिलात. अनेक संघर्षात तुम्ही मेळावा केला, सोबत कोण आहे बघितलं नाही. ◀◀ पान २ वर

# मुख्यमंत्री ग्रामसडक संशोधन योजने अंतर्गत ४० किमी सिमेंट रस्त्याला ६५ कोटी रुपयाचा निधी मंजुर

## आ.लक्ष्मण पवारांच्या प्रयत्नाला यश

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ.लक्ष्मण पवार यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री ग्रामसडक योजना संशोधन व विकास अंतर्गत तालुक्यातील ७ गावच्या एकूण ४० कीमी रस्त्यासाठी थिन व्हाईट टॉपिंग नुसार ६५ कोटी रुपयांचा निधीला १८ जुलै २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली असून हे सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटने होणार असून ग्रामीण भागातील रस्त्यासाठी होणारा हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग असून संबधित गावच्या रस्त्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे.**



आ. लक्षण पवार यांच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामीण भागातील जवळपास सर्वच रस्त्याचे प्रश्न मार्गी लागले असून राहिलेल्या आणखी सात गावच्या ४० किमी रस्त्यासाठी पुन्हा ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून हे सर्व रस्ते पूर्ण सिमेंट कॉक्रीटीकरण होणार असून लवकरच या रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. यामध्ये तलवाडा रोड ते रेवकी-देवकी व गोंदी या १२.२० किमी रस्त्यासाठी २७ कोटी रुपये, रामपुरी ते ढालेगाव ◀◀ पान २ वर

# बाबा सिद्दिकींच्या हत्येमागे बिश्नोई गँग

**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि माजी आमदार बाबा सिद्दिकी यांची शनिवारी रात्री वांद्र्यात खेरवाडी सिग्नलवर गोळ्या घालून हत्या करण्यात आली. या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगने स्वीकारली ◀◀ पान २ वर



### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० ऑक्टोबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.५० क्विंटल | २,६८१ | २,७०० | २,६९३ |
| ज्वारी/हायब्रिड :७८.०० क्विंटल | २,१४० | २,७०० | २,२६९ |
| मूग : २.५० क्विंटल | ६,४०० | ६,८५१ | ६,६२५ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : ७१.५० क्विंटल | ३,६५१ | ७,६०० | ६,६३३ |
| बाजरी : १९.५० क्विंटल | २,०११ | २,६९१ | २,४१० |
| मुग : २८.५० क्विंटल | ६,३०० | ७,२०० | ६,८४३ |
| सोयाबीन: ८०३.५० क्विंटल | ३,००० | ४,५०० | ३,९३० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

# मतदारसंघाचा विकास हेच सोळंके कुटुंबाचे ध्येय-आ.प्रकाश सोळंके

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

लोकनेते भूतपूर्व उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या पासून प्रेरणा घेत माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा विकास हेच सोळंके कुटुंबाचे ध्येय गेल्या ४० वर्षांपासून असल्याचे मत आमदार प्रकाश सोळंके यांनी ◀◀ पान २ वर



# रुग्णांसाठी खुशखबर..जेथे तपासणी तेथेच शस्त्रक्रिया

## जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरातांचा मोठा निर्णय



**बीड । प्रतिनिधी**

शासकीय रुग्णालये खऱ्या अर्थाने गरी रुग्णांना आधार देणारे ठरत असून गरजू रुग्णांवरील शस्त्रक्रि करण्यासाठी जिल्हा शल चिकित्सक डॉ. अशोक थोरात ंनी तगडे नियोजन केले आहे. त्यांनी जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णाल, ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय, वृध्दत्व व मानसिक रुग्णालय ंना याबाबत आदेशित केले आहे. ज्या रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्याची ◀◀ पान २ वर

### कोणत्या रुग्णालयात कोणत्या दिवशी शस्त्रक्रिया

मंगळवार पहिला व तिसरा उपजिल्हा रुग्णालय, गेवराई, ग्रामीण रुग्णालय, माजलगाव, (मेजर कॅम्प आरोग्य संस्था), ग्रामीण रुग्णालय, तालखेड, ग्रामीण रुग्णालय, तेलगाव (लॅपटीएल आरोग्य संस्था), मंगळवार दुसरा व चौथा -उपजिल्हा रुग्णालय, केज व धारुर, ग्रामीण रुग्णालय, नांदुरघाट व चिंचवण, शुक्रवार-पहिला व तिसरा-ग्रामीण रुग्णालय, पाटोदा व आष्टी, ग्रामीण रुग्णालय रायमोह, तसेच शुक्रवार दुसरा व चौथा- लोखंडी, उपजिल्हा रुग्णालय परळी, स्त्री रुग्णालय नेकनुर, ग्रामीण रूग्णालय धानोरा येथे ठरलेल्या दिवशी शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

### आठवड्यातून दोन दिवस शस्त्रक्रिया

वरील रुग्णालयात तपासणी करुन निदानं झाल्यावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असेल तर मंगळवार आणि शुक्रवारी शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या शस्त्रक्रिया त्याच रुग्णालयात होणार असून रुग्णांना त्या दिवशी येण्याबाबत माहिती देण्याचेही डॉ. अशोक थोरात यांनी संबंधित रुग्णालयांना आदेशित केले आहे.

" उच्चतम वर्ग "

कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना

श्री छत्रपती शिवाजी महाराज बाजार संकुल, भोकरदन-देऊळगाव राजा रिंगरोड, नविन मोंढा, जालना

उपबाजार पेठ : रामनगर, नेर, सेवली

ऑफिस : (02482) 229107, 229655, Email : am_jalna@msamb.com

महाराष्ट्रातील अग्रगण्य बाजार पेठेची काही ठळक वैशिष्ट्ये

- कृषी उत्पन्न बाजार समिती जालनाचे सर्व कार्यालयीन काम MY APMC app मध्ये लवकरच सुरू होणार
- बाजार संकुलात भुसार, गुळ, फळे व भाजीपाला, मोसंबी तसेच होलसेल किराणा, सिडस् मार्केट व शेतीपुरक सर्व व्यवसाय एकाच बाजार आवारामध्ये एकत्रितपणे सुरु.
- शेतकऱ्यांनी शेतमाल विक्रि केल्यानंतर 24 तासांच्या आत पेमेंट शेतकऱ्याना अदा करण्यात येते
- सर्व शेतमालाचे वजन इलेक्ट्रॉनिक वजनकाटयाव्दारेच.
- उपबाजार पेठ सेवली येथे दैनंदिन बाजार पेठ सुरु करुन शेतकऱ्यांच्या वाहन खर्चामध्ये बचत.
- रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी रेशीम कोष मार्केटची यशस्वी सुरुवात.
- शेतमाल तारण कर्ज योजने व्दारे शेतकऱ्यांना दिलासा.
- 24 तास 60मे.टनी इलेक्ट्रॉनिक्स भुईकाट्याची व्यवस्था.

शेतकऱ्यांसाठी आवाहन

- शेतकऱ्यांनी आपला शेतीमाल बाजार आवारामध्ये विक्रि करिता आणतांना ओलावा/काडी कचरा विरहीत आणावा ज्यामुळे आपल्या शेतमालास योग्य व जास्तीचा बाजार भाव मिळेल.
- शेतकऱ्यांनी आपला शेतीमाला बाजार समितीच्या बाजार आवारामध्येच विक्रिसाठी आणावा व खाजगी व्यापाऱ्यांकडुन आपली होणारी फसवणुक टाळावी.
- शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्री केल्यानंतर आपली शेतकरी पट्टी तपासुण पाहावी नियमाविरुध्द इतर कोणतीही कपात झाल्याचे निदर्शनास आल्यास बाजार समितीशी संपर्क साधावा.



मा.श्री.अर्जुनराव पंडीतराव खोतकर, मुख्य प्रशासक | मा.श्री.भास्करराव मुकुंदराव दानवे, उपमुख्य प्रशासक | मोहन कन्हीराम राठोड, सचिव

अशासकिय प्रशासक मंडळ

मा.आ.अरविंद बाजीराव चव्हाण,राहुल गोवर्धन गवारे,कालिंदा कैलास ढगे ,तुकाराम कमळाजी खर्जुले,नरसिंग गणेशराव गोरे, संदीप विठ्ठलराव वाघ, भगवान रामदास अंभोरे,अ.रशिद पहेलवान ,ज्ञानेश्वर उत्तमराव शेजूळ,सहदेव बाबासाहेब मोरे, आलमखान मुनीरखान पठाण, संतोष उत्तमराव मोहिते, राजेश रामभाऊ राऊत,विष्णु माणिकराव पाचफुले

cmyk

अग्रलेख

# नव्या सरकारला ताळमेळ साधावा लागेल

जम्मू-काश्मीरमध्ये लोकनियुक्त सरकार आले. विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीने स्पष्ट बहुमत प्राप्त केले. चार अपक्ष आमदारांनीही नॅशनल कॉन्फरन्सचा रस्ता धरला आहे. त्यामुळे काँग्रेसने भविष्यात काही त्रास दिला, तरी उमर अब्दुल्ला यांच्या लवकरच स्थापन होणाऱ्या सरकारला कोणता धोका नसेल. लोकशाहीच्या दृष्टीने आणि राज्यातील राजकीय स्थैर्यासाठी ही चांगली गोष्ट आहे. अशांतता असली किंवा राजकीय बजबजपुरी असली की राज्याचा विकास थांबतो. जम्मू-काश्मीर हे विशेष राज्य असल्यामुळे तेथे अस्थैर्याला स्थान देण्यास मुळीच वाव नाही.

विधानसभेच्या संख्याबळानुसार नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडी सरकार जरी स्थिर राहणार असले आणि ते लोकनियुक्त सरकार असले, तरी राज्यात आज बहुतांश अधिकार नायब राज्यापालांकडे अर्थात एलजींकडेच आहेत. दिल्लीतही एलजींकडे भरपूर किंवा बहुतांश अधिकार आहे. तेथील सरकारने राज्यपालांशी जुळवून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला की नाही याची माहिती सांगणे खरेतर अवघडच. मात्र नायब राज्यपाल आणि दिल्ली सरकार कायम दोन विरुद्ध टोकांना उभे असलेलेच गेल्या दहा वर्षांत दिसले. याउलट जम्मू-काश्मीरमध्ये सहा वर्षांनी लोकनियुक्त सरकार आले आहे. त्यामुळे नव्या सरकारला आणि त्याहीपेक्षा सरकारच्या नेतृत्वाला एलजींशी जुळवून घ्यावे लागेल. २०१९ मध्ये संसदेत जम्मू-काश्मीर रिऑर्गनायझेशन अर्थात फेररचना कायदा संमत करण्यात आला होता. त्यानुसार राज्याची जम्मू-काश्मीर आणि लडाख अशी दोन भागांत विभागणी करत ते केंद्रशासित प्रदेश करण्यात आले. फरक एवढाच की जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा आहे अन् लडाखमध्ये ती नाही. राज्यघटनेनुसार प्रत्येक केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन राष्ट्रपतींकडे असते. सोयीसाठी राष्ट्रपती प्रत्येक केंद्रशासित राज्यात आपला प्रतिनिधी नियुक्त करतात. तसे ते अशा प्रत्येक राज्यात करण्यात आले असून जम्मू-काश्मीरमध्येही मनोज सिन्हा एलजी आहेत. २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करण्यात आले. त्यापूर्वी राज्याला भरपूर अधिकार होते. याउलट तेथील बाबींत हस्तक्षेप करण्याच्या संदर्भात केंद्र सरकारला अथवा संसदेला अगदी मर्यादित वाव होता. तथापि, २०१९ नंतर हे सगळे बदलले. नव्या व्यवस्थेनुसार जम्मू-काश्मीरमध्ये पोलीस आणि कायदे व्यवस्था सोडून अन्य प्रत्येक बाबतीत कायदा करण्याचा विधानसभेला अधिकार असेल. मात्र, त्यातही एक पेच आहे. जर राज्य सरकारने राज्य सूचित समाविष्ट असलेल्या कोणत्याही विषयावर कायदा केला, तर त्यांना अगोदर ही दक्षता घ्यावी लागेल की, संबंधित बाबतीत केंद्र सरकारचा जो किंवा जे कायदे आहेत त्यावर राज्य सरकारच्या कायद्याचा कोणता प्रभाव पडणार नाही. याशिवाय नायब राज्यपालांच्या परवानगीशिवाय कोणतेही विधेयक अथवा दुरुस्ती विधेयक त्यांना विधानसभेत मांडता येणार नाही. या एकाच नियमात सगळा सार आहे. राज्यात सरकार कोणाचेही असले, तरी सर्वाधिकार हे नायब राज्यपालांकडेच असतील. त्याचे कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे दोन विषय वगळून अन्य कोणताही कायदा तयार करण्याचा अधिकार विधानसभेला असला, तरी मुळात अगोदर ते विधेयक मांडण्यापूर्वी नायब राज्यपालांची परवानगी आवश्यक असेल. केवळ एवढेच नाही तर नोकरशाही आणि अँटी करप्शन ब्यूरोवरही राज्यपालांचेच नियंत्रण असेल. याचा स्वच्छ अर्थ असा की सरकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांसाठी राज्यपालांची मोहोर उमटणे अनिवार्य असेल. नायब राज्यपालांनी कोणता निर्णय घेतला असेल आणि त्यापूर्वी त्यांनी मंत्रिमंडळाशी याबाबत चर्चा केली नसेल, तरीही त्याला न्यायालयात या आधारावर आव्हान दिले जाऊ शकणार नाही. अशा राज्याची कमान आता उमर यांना सांभाळायची आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने आश्वासने देताना दक्षता घेतली. त्यांच्या घोषणा केवळ लोकप्रिय अशा स्वरूपाच्या होत्या. याउलट त्यांनी ज्या नॅशनल कॉन्फरन्सशी आघाडी केली त्यांनी जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करणे आणि सगळ्यात महत्त्वाचे जम्मू-काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा समाप्त करणाऱ्या कायद्यांनाच रद्द करण्याचे आश्वासन दिले आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून ही बाब स्पष्ट झाली आहे की, राज्यातील जनतेने नॅशनल कॉन्फरन्सच्या आश्वासनांवर विश्वास ठेवला आहे. मात्र त्याचवेळी निवडणुकीत ज्या मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात मतदान झाले आहे त्यावरून हेही स्पष्ट झाले आहे की, राज्यातील जनतेला शांतता आणि सलोखा व प्रगती हवी आहे. लोकांच्या या अपेक्षेला जागायचे असेल तर नॅशनल कॉन्फरन्सला संघर्षाच्या भूमिकेत न जाता आपल्या अजेंड्यातील काही मुद्दे बाजूला ठेवून पुढे जावे लागेल. लोकांना सुरक्षित वाटेल असे वातावरण निर्माण करण्यास त्यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. शांतता असेल तरच काश्मीर देशासोबत विकासाच्या मार्गावर पुढे जाऊ शकेल. लोकांना दिलेली आश्वासने पूर्ण करायची असेल आणि विकास साधायचा असेल, तर त्यांना केंद्र सरकारच्याच मदतीची सातत्याने गरज भासणार आहे. हे लक्षात ठेवूनच सरकार चालवावे लागणार आहे. नायब राज्यपालांकडे असलेले अमर्याद अधिकार, निधी आणि अन्य बाबतींत केंद्राकडून हवे असलेले सहकार्य आणि आपण दिलेली आश्वासने यांच्यात ताळमेळ घालून काम करणे हेच नव्या सरकारला करावे लागेल. ते त्यांना कितपत साधते हे पाहावे लागेल.

# जनतेसाठी मैदानात उतरणार, सतीश घाटगे यांची भूमिका जाहीर

## पाच वर्षापासून जनतेच्या समोर असलेला घाटगे यांना उमेदवारी द्या

**जालना । प्रतिनिधी**

**पाच वर्षापासून रात्रंदिवस घनसावंगी विधानसभा मतदारसंघात थेट जनतेच्या समोर जाऊन प्रश्न सोडून न्याय देण्याचे काम तसेच विकासाचे काम करणारी एकच नेता सतीश घाटगे यांना भाजप पक्षाकडून उमेदवारी देण्यात यावे अशी रोखठोक मागणी शेतकरी व कार्यकर्ते , महिला यांच्याकडून करण्यात येत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने घनसावंगी विधानसभेतील भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी यांचा शुक्रवारी संवाद मेळावा झाला. या मेळाव्यास घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील हजारो कार्यकर्त्यांनी हजेरी लावून घनसावंगी विधानसभेची जागा भाजपला सोडून सतीश घाटगे यांना उमेदवारी देण्याची आग्रही मागणी पक्षांच्या नेत्याकडे केली. सतीश घाटगे यांनीही आपली भूमिका या मेळाव्यात जाहीर करत घनसावंगीची जागा सोडणार नाही, वेळप्रसंगी जनतेसाठी मैदानात उतरणार, अशा शब्दात निवडणूक लढविण्याचे संकेत दिले.**



या मेळाव्यास भारतीय जनता पार्टीची जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदर्गे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, पक्ष निरीक्षक गौतम गोलच्छा, विजय कामड , भाजपा तालुका अध्यक्ष शिवाजीराव बोबडे, डॉ. रमेश तारगे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष शिवाजीराव कंटुले , राहुल पाटील कणके, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजीराव मोरे, रामेश्वर माने , पुरुषोत्तम उढाण , पांडुरंग भांगे यांच्यासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. घनसावंगी शहरातील तहसील रोड शेजारी हा कार्यकर्ता संवाद मेळावा पार पडला. या मेळाव्यास अंबड, जालना आणि घनसावंगी तालुक्यातील हजारो भाजप कार्यकर्ते व गावागावातून सतीश घाटगे यांच्या समर्थक मोठ्या संख्येने आले होते. या मेळाव्यात भाजप कार्यकर्ते पदाधिकारी व सतीश घाटगे यांच्या समर्थकांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सतीश घाटगे यांनाच उमेदवारी मिळावी, अशी आग्रही मागणी पक्षाच्या नेत्याकडे व पक्ष निरीक्षकांकडे केली. तसेच सतीश घाटगे विधानसभा निवडणुकीत जी भूमिका घेतील त्या भूमिकेसोबत कार्यकर्ते व पदाधिकारी जातील, असेही कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले. या मेळाव्यात अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्यानंतर भाजप जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांनीही घनसावंगीची जागा भाजपला सुटावी अशीच मागणी पक्ष श्रेष्ठीकडे केल्याचे सांगितले. पक्ष निरीक्षक गौतम गोलेच्छा यांनी सतीश घाटगे यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच घनसावंगी विधानसभेत भाजपसाठी वातावरण पोषक असल्याचे सांगत पक्ष श्रेष्ठीकडे घनसावंगी विधानसभेची जागा सोडण्यासाठी शिफारस करणार असल्याचे सांगितलं. गेल्या अनेक वर्षापासून महायुतीमधील पक्षाच्या उमेदवारासाठी काम करत आला आहे. परंतु त्यांना यश आले नाही. आता भाजप मतदारसंघात मजबूत झाला असून आगामी निवडणूक जिंकू शकतो. त्यामुळे ही जागा भाजपलाच सुटली पाहिजे. जनभावनेचा आदर न झाल्यास सतीश घाटगे यांच्या पाठीमागे उभा राहण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी या मेळाव्यात केला.

# जिल्हा पदाधिकाऱ्यांना डावलून युवा सेनेच्या बीडमध्ये मेळावा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरामध्ये आज बाजीराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली युवा सेनेच्या राज्य कार्याध्यक्षांच्या उपस्थितीमध्ये युवा सेनेचा मेळावा होत आहे. मात्र या मेळाव्याची कल्पना शिवसेनेचे जिल्हा पदाधिकाऱ्यांना, वरिष्ठ नेत्यांना देण्यात आलेली नाही. वरिष्ठ नेत्यांच्या अनुपस्थितीत हा कार्यक्रम सुरू असून युवा सेनेने आतापर्यंत पहिलाच मेळावा आयोजित केला आहे. यापूर्वी युवा सेनेचे वाखाणण्यासारखे कुठलेही काम नाही. केवळ निवडणुकीच्या तोंडावर हा मेळावा होत असल्याने शहरांमध्ये चर्चेला उधाण आले आहे .

बीड शहरातील बार्शी रोडवर असलेल्या आशीर्वाद लॉन्स मध्ये आज युवा सेनेचे राज्य कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या उपस्थितीत युवा सेनेचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला हजारोंच्या संख्येने उपस्थिती असेल असा दावा युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. मात्र प्रत्यक्षात या कार्यक्रमाबद्दल वरिष्ठ शिवसेना पदाधिकाऱ्यांना, जिल्हाप्रमुखांना याची कल्पना नसल्याचे आयोजित पत्रकार परिषदेत स्पष्ट झाले. वरिष्ठांना डावलून वेगळी चूल मांडून कुठलेही काम नसताना हा मेळावा नेमका कशासाठी आयोजित केला.असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. आज पर्यंत युवा सेनेचा कुठलाही कार्यक्रम झाला नाही. मात्र निवडणुकीच्या तोंडावर हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या मेळाव्याला जिल्हाप्रमुखांना, उपजिल्हाप्रमुखांना किंवा शिवसेनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना कल्पना न देताच या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. युवा सेनेची ही वेगळी चूल म्हणावी की काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. शिवसेना आणि युवासेना एकत्र येऊन काम करणे अपेक्षित असताना युवा सेनेची नेमकी वेगळी चूल कशासाठी? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे .मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय समजणारे बाजीराव चव्हाण हे या मेळाव्याचे संयोजक आहेत. जर पक्षाला याचा उपयोग होणार असेल तर या मेळाव्याच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना मेळाव्याची पुर्व कल्पना देणे आवश्यक होते. मात्र असे न करता थेट पत्रकार परिषद घेऊन त्याची घोषणा करण्यात आली. याच परिषदेत वरिष्ठांना कल्पना नसल्याचे स्पष्ट झाले .अशा परिस्थितीत बाजीराव चव्हाण नेमके कशासाठी मेळावा घेत आहेत. हा सवता सुभा नेमका कशासाठी आहे? असा प्रश्न उपस्थित होत असून बाजीराव चव्हाण हे बीड विधानसभेचे उमेदवार म्हणून इच्छुक असल्याचीही चर्चा आहे. जर बाजीराव चव्हाण या मतदारसंघात उमेदवार होणार असतील तर जिल्ह्यात काम करणारे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी काय गोट्या खेळायच्या काय? असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होत आहे. हा मेळावा निवडणुकीच्या तोंडावर होत असेल आणि यात गटबाजी होत असेल तर आगामी निवडणुकीसाठी हे शिवसेनेला घातक असल्याचेही या निमित्ताने स्पष्ट होत आहे.



**बीड: शनिवार (दि.१२) रोजी श्री क्षेत्र नारायणगड येथे आयोजित दसरा मेळाव्यात लाखो मराठा बांधव आले होते. यावेळी मेळाव्याला येणाऱ्या बांधवांच्या पार्कींगची व्यवस्था व नियोजन आ.संदीप क्षीरसागर यांनी पाहिले.**

पान १वरून...

### सोयाबीन हमीभावाने खरेदीसाठी

खरेदीसाठी नाफेड आणि एनसीसीएफची २५५ खरेदी केंद्रे सुरु झाली आहेत. या केंद्रांवर शेतकऱ्यांची नोंदणी सुरु झाली, असे पणन विभागाच्यावतीने सांगण्यात आले. तर आणखी खरेदी केंद्रे सुरु करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचेही सांगण्यात आले. जास्त खरेदी केंद्रे सुरु झाली तरच शेतकऱ्यांना हमीभावाने खरेदीचा फायदा होणार आहे. कारण खुल्या बाजारात सोयाबीनचा भाव खूपच कमी आहे. त्यामुळे शेतकरी जास्तीत जास्त सोयाबीन हमीभावाने विक्री करणार आहेत. पण जास्त खरेदी केंद्रे नसतील तर शेतकऱ्यांना सोयाबीन विक्री करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे जास्तीत जास्त खरेदी केंद्रे सुरु करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

-----------

### महाप्रचंड..! भगवान

आमदार मोनिका राजळे, आमदार मेघना बोर्डीकर, आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे, आ. नमिता मुंदडा, माजी आमदार शिवाजीराव कर्डिले, तोताराम कायंदे, ह भ प राधाताई सानप आदींसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंकजाताई मुंडे यांच्या या मेळाव्याकडे राज्याचं लक्ष लागलं होतं. या मेळाव्यात बोलताना पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भाषणाची सुरवात हिंदी कवितेच्या अर्थपूर्ण चार ओळीनी केली. इन्सान की ही जाती हूं, फिर भी मुश्किल जीना जिती हूं, जातीभेद और पिछडेपन का नित्य जहर जो पिती हूं, कमजोर हो जो चल ना सके, मैं उनकी हाथ की लाठी हूं, मैं गोपीनाथ मुंडे की बेटी हू'', असं म्हणत उपस्थितांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, ''मला लोकनेते मुंडे साहेबांनी वारसा दिला, त्यांनी भगवान गडावरून शेवटचं वाक्य म्हटलं होतं की, मला गडावरून दिल्ली, मुंबई नाही तर पंकजा दिसते. त्यामधून मला त्यांनी एक संदेश दिला. मला जीवनात काही निर्माण करता आलं नाही. पण मी एक भगवान भक्तीगड उभा केला. मुंडे साहेबांनी दिलेला शब्द मी पूर्ण करून दाखवला. मला येथील जनता जास्त प्रिय आहे. माझ्यावर ज्यावेळी जीएसटीची रेड पडली होती, त्यावेळी या सर्व लोकांनी १२ कोटी रुपये जमा केले होते. माझ्या निवडणुकीचा निकाल लागला होता, तेव्हा या लोकांनी जीव दिला. आज माझा मुलगा आर्यमान भगवान बाबांचे दर्शन घेण्यासाठी मुद्दामहून इथं आला आहे असं म्हणत त्याला व्यासपीठावरून बोलावले व म्हणाल्या, आईचे मुलावर किती प्रेम असते परंतू मी त्याला सांगितले आहे की, तुझ्यापेक्षा माझा जीव इथे बसलेल्या सर्व लोकांवर जास्त आहे. मी माझ्या लेकरांपेक्षा तुम्हाला जास्त जीव लावते. मी कुणालाही घाबरत नाही. मंत्री असताना खूप कामे केली. सर्वांना न मागता निधी दिला. ऊसतोड मजूरांच्या मजूरीत भरीव वाढ केली आता या उसतोड कामगारांचे आयुष्य बदलल्याशिवाय शांत बसणार नाही.

**आपला डाव खेळायचा की नाही?**

मी दसरा मेळाव्याला दर वर्षी आल्यानंतर तुम्हाला सर्वांना साष्टांग नमस्कार घालते. मी तुम्हाला साष्टांग नमस्कार का घालते? कारण माझ्या वडिलांनी तुमची जबाबदारी माझ्या झोळीत टाकली. मी विजयी झाल्यावर तुम्ही मला मोठा मान दिला. पण माझा पराभव झाल्यानंतरही तुम्ही मला त्याहीपेक्षा जास्त मान दिला. आता तुम्हा सर्वांना मान देण्यासाठी मी प्रत्येक गावागावात आणि महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात दौऱ्याला येणार आहे. आपल्याला आपला डाव खेळायचा की नाही? या मंचावर अठरा पगड जातीचे लोक आहेत आणि समोर सर्व धर्माचे लोक आले आहेत असं पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं.

**जातीपातीचं नाही तर सत्व आणि तत्व जपूनच माझं राजकारण**

तुम्हाला वाटतं का माझा पराभव झाल्यामुळे मी थकले आहे. पण मी सांगते घोडा मैदान लांब नाही. संत भगवान बाबांनी ज्या कारणासाठी गड उभारला ते कारण विसरून कधीही राजकारण करणार नाही. गडाचे पावित्र्य नेहमीच टिकून ठेवेन. मी आजपर्यंत कधी जातीपातीच राजकारण केलं नाही. डाग पडू नये याची काळजी घेत सत्व आणि तत्व जपूनच माझं राजकारण असते. राज्यातील कानाकोपऱ्यात आमच्या लोकांना कुठेही त्रास दिला, वंचितांना, पिडीतांना दलितांना गरिबांना त्रास दिला तर त्याचा हिशेब केल्याशिवाय राहणार नाही असा इशारा पंकजाताईंनी मुंडे यावेळी दिला.

------------

### जहागीरदाराची आवलाद आली तरी झुकायचे नाही

दसरा मेळाव्याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागून राहिले होते. या मेळावासाठी राज्यभरातून विराट गर्दी झाली आहे. लाखोंचा मराठा समाज मनोज जरांगे पाटील यांच्या दसरा मेळाव्यासाठी नारायण गडावर पोहोचला. त्यामुळे नारायणगडावरून मनोज जरांगे पाटील कोणता संदेश देणार? याकडे राजकीय वर्तुळासह मराठा समाजाचे सुद्धा लक्ष होते. दरम्यान यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी पहिल्यांदाच समाजावर अन्याय होणार असल्यास शांत बसणार नसल्याचे स्पष्टपणे सांगितले. ते म्हणाले की, एकवेळा याठिकाणी झालेली गर्दी कॅमेरामनमधून लोकांना दाखवू द्या. एकदा त्यांचे दाताड पडू द्या, कार्यक्रमच झाला म्हणून समजा, अशा शब्दामध्ये त्यांनी टोला लगावला. या नारायण गडाने कधीच जातीची शिकवण दिली नसून समतेचा संदेश दिला असल्याचे ते म्हणाले. मराठा समाज एकदा साथ दिली तर सोडत नाही आणि एकदा नाही म्हणल्यावर मागे काय झाले सर्वांना माहित आहे. कसा दणका दिला हे राज्याने पाहिले असे ते म्हणाले.

-----------------

### मुख्यमंत्री ग्रामसडक संशोधन योजने अंतर्गत ४०

या ४.७० किमी रस्ता ७ कोटी ४४ लक्ष रुपये, सुर्डी फाटा ते सेलू ३.५०.किमी रस्ता ५ कोटी २४ लक्ष रुपये, लोणाला फाटा ते खेर्डावाडी-सिंदफना चिंचोली ४.६० किमी रस्त्याला ६ कोटी ६८ लक्ष रुपये, जातेगाव रोड ते मुधापुरी ५.६१ किमी रस्त्याला ७ कोटी ९१ लक्ष रुपये, राष्ट्रीय महामार्ग (सावरगाव) ते चिखली ४.२० किमी रस्त्याला ६ कोटी २८ लक्ष रुपये, चकलांबा रोड ते ब्रम्हगाव ३.१० किमी रस्त्याला ४ कोटी ३९ लक्ष रुपये असा एकूण ४० किमी रस्त्यासाठी ६५ कोटी रुपयांच्या निधीला १८ जुलै २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली असून हे सर्व रस्ते थिन व्हाईट टॉपिंग नुसार पूर्णपणे सिमेंट कॉक्रीटीकरनाणे पूर्ण होणार आसून ग्रामीण भागातील रस्त्यासाठी हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग असून यामुळे हे रस्ते वर्षानुवर्षे टिकून राहतील असे सांगण्यात आले. दरम्यान येत्या दोन दिवसात या सर्व रस्ता कामाचे उदघाटन होणार आसून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचे आ.लक्ष्मण पवार यांच्या कार्यालयाकडून कळवण्यात आले आहे.

-------------

### कोणीही भगवान गडाच्या मेळाव्याची

भाऊ आहे की नाही हे पाहिलं नाही. जरी १२ वर्ष आपलं पटलं नाही. तरी मी वेगळा मेळावा करण्याचा विचार मनात ही आणला नाही. ज्याला जो वारसा दिला आहे त्याने तो चालवायला पाहिजे. मला, पंकजाला जेवढा आनंद आहे त्या पेक्षा जास्त आनंद तुमच्या डोळ्यात दिसत आहे. नवीन मेळावा सुरु करून कोणीही या मेळाव्याची पवित्रता संपवू शकत नाही, अशी टीका धनंजय मुंडे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर नाव न घेता केली आहे.

-----------------------

### बीडमधून डॉ.क्षीरसागर यांना

पार्थ पवार यांची भेट घेऊन सत्कार केला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पुढील दोन ते तीन दिवसात आचारसंहिता लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात घडामोडींनी वेग घेतला आहे. महायुतीत बीड मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला येण्याची शक्यता आहे. या मतदारसंघातून गेल्या २ वर्षांपासून डॉ.योगेश क्षीरसागर हे विधानसभा निवडणुकीची तयारी करत आहेत. परंतु निवडणुकीच्या तोंडावर अनेक इच्छुक तयार झाले. आपापल्या परीने इच्छुकांची तयारी सुरू आहे. मात्र इच्छुकांपैकी डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पारडे जड दिसत असून विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी बूथ पातळीपासूनची यंत्रणा सज्ज आहे.

**संकेत मिळाल्याने समर्थकांचा वाढला उत्साह**

राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली एकनिष्ठपणे पक्ष संघटन मजबूत केले आहे. त्यांच्या कार्याची दखल पक्षपातळीवर घेण्यात आली असून ताकदीने कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्याचे समजते. त्यात खुद्द पार्थ पवार यांनी उमेदवारीचे संकेत दिले असल्याची माहिती समोर येत असल्याने डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या समर्थकांचा उत्साह वाढला आहे.

-----------

### मतदारसंघाचा विकास हेच सोळंके

दिंद्रुड येथे दिंद्रुड ते आडस या २८ किलोमीटर सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ प्रसंगी केले. दिंद्रुड येथील अक्षरा मंगल कार्यालयात रविवारी ते बोलत होते. लोकनेते सुंदरराव सोळंके साहेब यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या विकासाचा मूलभूत पाया रचला. मतदार संघातील गावांना पाणी, आरोग्यसेवा सह सार्वभौम सुखसोयी देण्यासाठी मी गेल्या ३० वर्षांपासून तत्पर असल्याचे पुढे ते बोलले. दिंद्रुड ते अंबाजोगाई जाणारा हा रस्ताची अतिशय दुरावस्था झाल्यामुळे दळणवळणाला होणारा त्रास व मनस्ताप यापुढे जनतेला सहन करावा लागणार नाही अतिशय उत्कृष्ट प्रकारे या रस्त्याचे काम सर्व जनतेच्या निगराणीत आपण करणारा असून मतदारसंघाच्या विकासासाठी सोळंके कुटुंब सदैव तत्पर असल्याचे ते म्हणाले. अक्षरा लॉन्स येथे आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे युवा नेते जयसिंह सोळंके यांच्यासह माजलगाव,वडवणी, धारूर तालुक्यातील पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. आमदार प्रकाश सोळंके हे सर्वसामान्यांसह दिनदलितांचे कैवारी असून मतदारसंघाच्या विकासासाठी त्यांचे ध्येय वाखाणण्याजोगे असल्याचे मत पोटभरे यांनी व्यक्त केले. आजोबा सुंदरराव सोळंके साहेब, काका प्रकाश दादा सोळंके यांच्या कर्तव्यतत्परतेचा अनुभव माझ्या पाठीशी असून मतदार संघासाठी मी सदैव जनतेसोबत सक्रिय असल्याचे मत युवा नेते जयसिंह सोळंके यांनी या कार्यक्रमात केले. या कार्यक्रमासाठी दिंद्रुड, देवदहिफळ, कांदेवाडी, कचारवाडी, हिंगणी बु.,हिंगणी खु. व्हरकटवाडी, मोहखेड, आमला, सुरनरवाडी, सिंगनवाडी, असरडोह येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

------------

### बाबा सिद्दिकींच्या हत्येमाग

आहे. बिश्नोई गँगमधील एका सदस्याने फेसबुक पोस्ट केली असून, ती व्हायरल झाली आहे. त्यात असे म्हटले आहे की सिद्दीकी यांचे बॉलिवूड अभिनेता सलमान खान आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम आणि अनुज थापन याच्याशी असलेल्या संबंधांमुळे ही हत्या करण्यात आली आहे. बिश्नोई गँगने फेसबुक पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे की, ''सलमान खान, आम्हाला हे युद्ध नको होते. पण तू आमच्या भावाचे (लॉरेन्स बिश्नोई) नुकसान केले आहेस. आज बाबा सिद्दीकी हे सज्जन असल्याचा आव आणला जात आहे. पण ते कधीकाळी दाऊद सोबत मोका कायद्याखाली होते. त्यांच्या मृत्यूचे कारण म्हणजे दाऊदला बॉलिवूड, राजकारण, प्रॉपर्टी डीलिंगशी जोडल्याचे होते. तसेच या शिवाय पोस्टमध्ये अनुज थापन याच्याही नावाचा उल्लेख केला आहे. ज्याने सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार केला होता. त्यानंतर पोलीस कोठडीत त्याचा मृत्यू झाला होता. हा मृत्यू त्यांचा बदला असल्याचे गँगने म्हटले आहे.

**एका आरोपीला २१ तारखेपर्यंत पोलिस कोठडी**

मुंबई गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रविवारी आरोपींना न्यायालयात हजर केले असता सरकारी आणि आरोपींच्या वकिलांमध्ये बराच वेळ युक्तिवाद झाला. दोन्ही बाजूंच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी गुरुनैल सिंगला २१ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. तर दुसरा आरोपी असलेल्या धर्मराज कश्यप याचे वय तपासले जाणार आहे. एका आरोपीचे वय १७ असल्याचा युक्तिवाद त्यांच्या वकिलांकडून करण्यात आला होता.

-----------

### रुग्णांसाठी खुशखबर..जेथे तपासणी

सो आहे, त्याच म्हणजे जेथे तपासणी व निदान झाले तेथेच ापुढे शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचा मोठा निर्ण जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात ंनी घेतला आहे. यामुळे असंख रुग्णांची धावपळ थांबणार असून त्यांच्यासाठी हा मोठा दिला आहे. गरजू रुग्ण तपासणीसाठी आल्यावर त्यांची तपासणी करुन निदान झाल्यावर जर कॅ व लॅप टीएल शस्त्रक्रिची आवश्यकता असलेल्या रुग्णांना जिल्हास्तरावर किंवा इतरत्र संदर्भित न करता संबंधित रुग्णांना आपल्या आरोग संस्थेमध्येच शस्त्रक्रि करण्याचे ठरविण्यात आले आहे. तसेच ज्या आरोग संस्थेतील शस्त्रक्रिगृह पुर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे अशा उपजिल्हा रुग्णाल अथवा ग्रामीण रुग्णालयामध्ये सदरील शस्त्रक्रि करण्यात येणार आहे. अशा शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉ. अशोक थोरात यांनी तगडे नियोजन केले आहे. ज्या रुग्णांची तपासणी व निदान मेजर कॅम व लॅप टील या आरोग संस्थेमार्फत होईल त्याची ठिकाणी रुग्णांवर शस्त्रक्रिया केली जाणार असल्याने रुग्णांवर यापुढे भटकंती करण्याची वेळ येणार नाही. डॉ. थोरात यांनी याबाबत संबंधितांना सक्त सुचना दिल्या आहेत. तसेच यावर ते स्वत: लक्ष ठेवणार आहेत.

## आष्टीवासियांच्या स्वप्नातील घरांची आम्ही करणार स्वप्नपूर्ती
## मान्यवरांच्या हस्ते होणार अंबिका रेसिडेन्सीचे भूमिपूजन – इंजि.भुकन

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टीवासीय नागरिकांच्या स्वप्नातील घरांची स्वप्नपूर्ती आम्ही करणार असून यशोदीप कन्स्ट्रक्शन आणि समृद्धी यश डेव्हलपर्स यांचे द्वारे आष्टी येथे अद्ययावत सोयी सुविधांनी युक्त असे १०० सदनिका बांधकाम करण्यात येणार आहेत. आज आ.बाळासाहेब आजबे, माजी आ.भीमराव धोंडे माजी राज्य मंत्री सुरेश धस, माजी आ. साहेबराव दरेकर या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये आणि ह.भ.प. महंत विठ्ठल महाराज गहिनाथगडकर, अ.भा.वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले, ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल, ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापु, ह.भप.महंत राधाताई सानप महाराज, यांच्या व ईतर महाराज यांच्या हस्ते अंबिका रेसिडेन्सीचे भूमिपूजन आणि फ्लॅट विक्री ऑफिसचे शुभारंभ करण्यात येणार आहे अशी माहिती यशोदीप कन्स्ट्रक्शन कंपनी आणि समृद्धी एस डेव्हलपर्सचे संचालक इंजि. बाळासाहेब भूकन यांनी दिली

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की,अहिल्यानगर ते बीड यादरम्यान सात मजली टॉवर्स केवळ आष्टी येथे उभारण्यात येणार असून या रेरा कायद्यानुसार सर्व सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.अंबिका रेसिडेन्सी येथे २ चे ८४ फ्लॅट आणि ३ बीएचके १४ फ्लॅट आणि जिम क्लब हाऊस योगा सेंटर असे एकूण १०० फ्लॅटचे बांधकाम होणार आहे. सात मजली तीन टॉवर्समध्ये हे बांधकाम होणार आहे. या निवासी इमारतींमध्ये दोन बीएचके आणि थ्री बीएचके फ्लॅट उपलब्ध होणार आहेत. इमारतींपासून १२ मीटर रुंदीचा डीपी रोड मंजूर आहे.येथील रहिवाशांसाठी ही मोठी सुविधा आहे या तीनही इमारतींमध्ये आष्टी नगरपंचायत द्वारे आणि कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे कडून पुरेसा पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. बायोमेट्रिकल लिफ्ट बसवण्यात येणार असल्यामुळे अनोळखी नागरिकांना या इमारतीत मध्ये प्रवेश करता येणार नाही सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही मोठी उपलब्ध असेल असे सांगून ते म्हणाले की या सर्व फ्लॅटचे वास्तुशास्त्रानुसार बांधकाम करण्यात आले आहे.सर्व इमारतींना कॉमन लाईटसाठी सोलर सिस्टिमद्वारे वीज पुरवठा करण्यात येणार आहे. सीसीटीव्हीच्या निग्रणीखाली संपूर्ण परिसर येणार आहे. सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि.१४ ऑक्टोबर २०२४



# ६६ हजार ६३८ शिक्षकांना मिळणार टप्पा वाढीचा लाभ
## अखेर ५६ व्या दिवशी शिक्षक समन्वय संघाच्या आंदोलनास यश

**वडवणी । प्रतिनिधी**

**राज्यातील खाजगी प्राथमिक,माध्यमिक,उच्चमाध्यमिक व वर्गतुकड्यांतील ६६ हजार विना तथा अंशत:अनुदानित शाळेतील शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासननिर्णय १५ नोव्हेंबर २०१५ व ०४ जून २०१४ मधील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू करत या शाळांना १ जानेवारी २४ पासून विनाअट टप्पा वाढ लागू करणे, शासनाच्या चुकीमुळे १२,१५ व २४ फेब्रुवारी २१ च्या शासननिर्णयान्वये शासन स्तरावर त्रुटी पात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ लागू करणे यासह इतर मागण्या साठी शिक्षक समन्वय संघावतीने मुंबईतील आझाद मैदानावर १६ ऑगस्ट २४ पासून हुंकार बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले होते आज ५६ व्या दिवशी मंत्रीमंडळाच्या बैठकीत सदरील मागण्यांचा ठराव मंजूर करून अंशत:अनुदानित शाळेतील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिक्षक समन्वय संघाने न्याय मिळवून दिला आहे.५६ दिवस चालेलेल्या या लढ्याचे आतापर्यंत सर्वात मोठे यश आहे.**

राज्यातील कायम शब्द काढलेल्या प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यावर सुमारे ६६ हजार ६३४ शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी पंधरा ते वीस वर्षां पासून विनावेतन तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या महान शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. शिक्षक दिनी शिक्षकांना देशाचे शिल्पकार,आधारस्तंभ म्हणायचे आणि त्यांच्या सेवेला वीस–वीस वर्षे झाली तरी तुटपुंज्या वेतनावर काम करत होते.६ हजार ३३६ शाळेतील एकूण ६६ हजार ६३४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रातिनिधिक स्वरूपात शिक्षक समन्वय संघाच्या वतीने आझाद मैदान, मुंबई येथे हुंकार आंदोलन गेली ५६ दिवस झाले सुरू होते. राज्याचे संवेदनशील मा.मुख्यमंत्री दोन्ही मा.उपमुख्यमंत्री व मा.शिक्षणमंत्री या महोदयांनी दखल घेत राज्य सरकारने आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत एकमताने शिक्षक समन्वय संघाच्या मागण्यांचा ठराव मंजूर करून सर्वांना २० टक्केचा तर १२,१५ व २४ फेब्रुवारी २०२१ च्या शासननिर्णयातील शाळांना व्यापगत झालेला टप्पा व काल्पनिक पद्धतीने एक टप्पा वाढ करत समान टप्पावाढ,डोंगरी दुर्गम, अल्पसंख्याक शाळांच्या पटसंख्या कमी करणे अशाप्रकारे निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले आहे.





यापूर्वी झालेली फसवणूक पाहता जोपर्यंत या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचा व शिक्षक समन्वय संघाच्या मागण्यांचा शासननिर्णयाचा (कागद) निर्गमित होणार तोपर्यंत शिक्षक समन्वय संघ आझाद मैदान,मुंबई सोडणार नाही अशी भूमिका शिक्षक समन्वय संघाच्या वतीने स्पष्ट करण्यात आली होती.याच भुमिकेक्कला अनुसरून आंदोलन सुरूच राहणार आहे.

आजच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा राज्यातील प्राथ ११ हजार १४५,माध्य २७ हजार १२९,उच्च माध्य २८ हजार ३६४ अशा एकूण ६६ हजार ६३४ शिक्षक –शिक्षकेत्तर पदांना लाभ मिळणार असून या मंत्रीमंडळाच्या निर्णयाने अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा काही अंशी प्रश्न मिटला जरी असला तरी भविष्यात प्रचलीत पद्धतीने वेतन अनुदानाच्या लढ्यासाठी शिक्षक समन्वय संघ आपला लढा लढत राहणार आहे.
के.पी.पाटील,
समन्वयक,शिक्षक समन्वय संघ, आझाद मैदान मुंबई

शासनाच्या वतीने अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षकांना यथोचित न्याय मिळवून शिक्षक समन्वय संघाच्या वतीने सुरू असलेले आंदोलन शासननिर्णय (कागद )घेतल्याशिवाय माघार होणार नाही या भुमिकेला आजच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयाने काही अंशी यश आले असले तरी शासननिर्णय(कागद) निर्गमित झाल्याशिवाय माघार नाही या भुमिकेवर आम्ही ठाम आहोत
प्रा.राहुल कांबळे
समन्वयक,शिक्षक समन्वय संघ,महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री यांनी अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना परिपूर्ण न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील होते आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयाने या बांधवाचे अश्रू पुसण्याचे काम मा.शिक्षणमंत्री यांनी पुढाकार घेत केले आहे.
अँड.तुकाराम शिंदे
अध्यक्ष–कुणबी मराठा संघटना, महाराष्ट्र राज्य

## बाजीराव चव्हाण यांची युवाशक्ती आज आपली ताकत दाखवणार



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे लोकप्रिय संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व लोकप्रिय खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कार्यतत्परतेने प्रेरित होऊन आज महाराष्ट्रातील तळागाळातील युवावर्ग लाखोच्या संख्येने युवा सेनेसोबत उभा राहत आहे. युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेस सरनाईक, आरोग्य दूत बाजीराव चव्हाण, हे तळागाळातील युवा सैनिकांना आपल्या सोबत घेऊन महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाडा पिंजून काढत आहेत. युवा सेना अजून मजबूत करण्यासाठी राज्यासह मराठवाडा दौरा करत आहेत. याचेच औचित्य साधून आज दिनांक १४ ऑक्टोबर रोजी वार सोमवार वेळ ठिक १२ वाजता आशिर्वाद लॉन्स, सोमेश्वर मंदिराच्या बाजुला, बार्शी रोड बीड येथे होणार आहे. युवासेनेचे राज्य कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक हे या कार्यक्रमात आपली हजेरी लावणार आहेत. या महत्वपूर्ण कार्यक्रमात ते आज बीडमध्ये येत असून ते आज बीड जिल्ह्यातील तमाम युवा सैनिकांना आपले मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. त्यासोबत आरोग्य दूत बाजीराव चव्हाण आपल्या हजारो युवासैनिक, तसेच शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे शेकडो पदाधिकारी, व बीड जिल्ह्यातील असंख्य शिवसैनिक व त्यांचे खंदे समर्थक, कार्यकर्ते यांच्यासह आपली युवाशक्तीची ताकद दाखवून देणार आहेत. युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांचा हा उद्याचा दौरा बीड साठी महत्वपूर्ण माणला जात आहे. या कार्यक्रमात आरोग्य दूत बाजीराव दादा चव्हाण यांची बीडची उमेदवारी व त्यांना येणाऱ्या विधासभेसाठी ग्रीन सिग्नल मिळणार असल्याचेही बीड जिल्ह्यात चर्चा जोरदार होत आहे. त्यामुळे बाजीराव चव्हाण आपल्या पाठीशी हजारोंच्या संख्येने युवाशक्तीची असलेली ताकत दाखवुन देतील अशी सध्या चर्चा आहे. त्यामुळे उद्याच्या या अभुतपुर्व कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील युवाशक्तीने लाखोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवा सेनेचे युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, व युवा सेना बीड जिल्हा प्रमुख सुमित कोळपे, युवा सेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे यांनी केले आहे.

## नागवंशी बुद्ध विहार येथे धम्म चक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

आज धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त सकाळी ठीक ११:०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितित ध्वजारोहण करण्यात आले व भारतीय राज्यघटनेचे निर्माते,भारतरत्न, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन



महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धर्म स्वीकारला, ज्यामुळे आजचा दिवस महत्त्वपूर्ण आहे त्या अनुषंगाने नागवंशी बुद्ध विहार वडवणी या ठिकाणी नागवंशी बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करून करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संपादक –सतीश वाघमारे यांनी केले तर बाबासाहेब साळवे यांनी आपले बहूमुल्य विचार मांडले.यावेळु वडवणी नगरपंचायतच्या मा सभापती ध्रोपतीबाई वाघमारे, प्रा प्रकाश खळगे सर, बौद्धाचार्य अण्णा मस्के,बहूजन विकास मोर्चाचे ता अध्यक्ष बाबासाहेब वाघमारे, भालेराव मित्र मंडळाचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब साळवे,शिलाताई उजगरे, संपादक –सतीश वाघमारे, पत्रकार सतीश मुजमुले,आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष महादेव आवाड, अस्लम सय्यद,दिपक वडमारे सर, उजगरे मामा,भिकाराम साळवे, हनुमंत उजगरे, महादेव मुजमुले,सुभाष खळगे,यांच्या सह महिलांची उपस्थिती तसेच सर्व उपासक उपासिका नेतेगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मान्यवरांच्या उपस्थितीत तात्या–आभई प्रतिष्ठानचे सेवा गौरव पुरस्कार प्रदान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील तात्या–आभई प्रतिष्ठान च्या वतीने ऍड. अण्णासाहेब लोमटे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जाहीर करण्यात आलेले सेवा गौरव पुरस्कार नुकत्याच एका शानदार कार्यक्रमात मान्यवरांना प्रदान करण्यात आले.

१० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता नगर परिषदेच्या विलासराव देशमुख सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमात हे पुरस्कार आ. नमिता अक्षय मुंदडा, स्थानिक स्वराज्य संस्थेचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, तहसीलदार विलास तरंगे, सामाजिक कार्यकर्ते दाजी साहेब लोमटे, युवा नेते बबन लोमटे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रतिष्ठान चे अध्यक्ष ऍड. राजेंद्रप्रसाद धायगुडे यांनी तात्या –आभई प्रतिष्ठान च्या वतीने मागील तीन वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सेवा गौरव पुरस्कार देवून गौरव करण्यात येत असून यावर्षीही



विधी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ज्येष्ठ विधिज्ञ ऍड. विठ्ठल कृष्णाजी चौसाळकर यांना विधी सेवा गौरव पुरस्कार, आरोग्य सेवेतील विशेष कार्याबद्दल डॉ. सिध्देश्वर बिराजदार यांना ''आरोग्य सेवा गौरव पुरस्कार'', शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रा. संजय प्रभाकर कुलकर्णी यांना ''शिक्षण सेवा गौरव पुरस्कार'', पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सुदर्शन रापतवार यांना ''पत्रकारिता गौरव पुरस्कार'' तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ऍड. संतोष पवार यांना ''समाजसेवा गौरव पुरस्कार '' प्रदान करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी विधी क्षेत्रातील त्यांचे गुरू ऍड. अण्णासाहेब लोमटे यांच्या कार्याचा गौरव केला. हा पुरस्कार प्रदान कार्यक्रम आणखी मोठ्या प्रमाणावर घेण्याचा प्रतिष्ठान चा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात डॉ. सिध्देश्वर बिराजदार यांनाआरोग्य सेवा गौरव पुरस्कार, प्रा. एस. पी. कुलकर्णी यांना शिक्षण सेवा गौरव पुरस्कार, ऍड. संतोष पवार यांना समाज सेवा गौरव पुरस्कार तर सुदर्शन रापतवार यांना पत्रकारिता सेवा गौरव पुरस्काराने स्मृती चिन्ह, सन्मान पत्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

सदरील पुरस्कार वितरण कार्यक्रमात बोलताना आ. नमिता मुंदडा, स्थानिक स्वराज्य संस्थेचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, युवा नेते बबन लोमटे, ऋषिकेश अण्णासाहेब लोमटे यांनी ऍड. अण्णासाहेब लोमटे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ ऍड. राजेंद्रप्रसाद धायगुडे हा उपक्रम राबवित असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमात डॉ. सिध्देश्वर बिराजदार, प्रा. एस. पी. कुलकर्णी, ऍड. संतोष पवार आणि सुदर्शन रापतवार यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भागवत मसणे व शितल बोधले यांनी केले. या कार्यक्रमास विधी, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# पाल्यांच्या उज्वल भविष्यासाठी आदर्श पालक बना – मानसोपचार तज्ञ उमाताई माने

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

पाल्यांच्या उज्वल भविष्यासाठी आदर्श पालक व्हायचे असेल तर आपल्या मूलांचे मित्र व्हा, वेळप्रसंगी मुलांना पाठिंबा द्या त्यांच्यासोबत लवचिकतेने वागा व पालकांची कणखरता आत्मसात करताना मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेण्याचा सल्ला सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ उमा माने यांनी दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयात आयोजित माता पालक मेळाव्यात केले. जवळपास पाच हजार पालकांची याप्रसंगी उपस्थिती होती.

दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालय प्रतिवर्षी माता पालक मेळाव्याच्या आयोजन करत असते. आपल्या पाल्यांना शालेय जीवनात वावरताना त्यांच्यासोबत असलेले सलोख्याचे संबंध व भविष्यात आपली पाल्य यशस्वी नागरिक बनवण्यासाठी खोलेश्वर विद्यालयाचा पालकांना मार्गदर्शन पर कार्यक्रम घेण्यात येतो.प्राथमिक व शालेय शिक्षण घेताना विद्यार्थ्यांच्या बालमनावर पालकांसह शिक्षकांचा भीतीचा असलेला डोंगर कोसळणे आवश्यक आहे. आपल्या मुलांची मित्र



खोलेश्वरच्या माता पालक मेळाव्यात पालकांनी घेतला यशस्वी जीवनाचा मूलमंत्र

म्हणून समजून सांगत असताना पालक म्हणजे पा – पाठीशी,पाठिंबा, ल– लवचिकता, क– कणखर पणा चा योग्य उपयोग याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी पुणे येथील सुप्रसिद्ध लेखिका मानसोपचार तज्ञ उमा माने या दिंद्रुड येथे मार्गदर्शनासाठी उपस्थित होत्या. आपल्या मुलांना बाल वयात वाचन, क्रीडा, व्यवहारात चातुर्य,जीवन जगण्यासाठी असणाऱ्या विविध बाबींवर योग्य ते मार्गदर्शन मित्रत्वाच्या नात्याने करा त्याचा बालमनावर चांगला परिणाम होईल व भविष्यातील सुज्ञ व सार्वभौम यशस्वी नागरिक होण्यासाठी बालकांना मदत होईल याबाबत श्रीमती माने यांनी सखोल मार्गदर्शन याप्रसंगी केले. शिवाजी महाविद्यालय परभणीचे प्रा.आबासाहेब सावंत हे या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी उपस्थिती होती. संस्थापक अध्यक्ष दिलीपजी पारेकर साहेब यांनी मान्यवरांचा सत्कार करत स्वागत केले.

या कार्यक्रमाची सुरुवात खोलेश्वर, राष्ट्रमाता जिजामाता, छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी बाल विद्यार्थ्यांनी सुंदर स्वागत सादर केले, प्रस्ताविक संस्थेच्या मुख्याध्यापिका सरिता फपाळ यांनी करत शाळेच्या सार्वभौम प्रगतीचा आलेख उपस्थितांसमोर मांडला. बाल विद्यार्थी होरमळे श्रुती व रायकर संचिता यांनी बहारदार सूत्रसंचालन केले.

याप्रसंगी संगीत विभागाच्या गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. उपस्थितांचे आभार शिंदे वैभवी या विद्यार्थ्यांने केले.

या कार्यक्रमास खोलेश्वर विद्यालयाचे सचिव विलासकाका पारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.

पान ६ वरून...

## लाल बावटा बांधकाम

वतीने १२ ऑगस्ट २०२४ लाल साह्यक कामगार आयुक्त कार्यालय व सरकारी कामगार अधिकारी कार्यालयवर हाजोरोंच्या संख्येने मोर्चे काढले तरी या दिवाळी सानुग्रह अनुदानाची अंमलबजावणी केली नाही म्हणून सांगली येथे कामगार मंत्री सुरेश भाऊ खाडे यांच्या निवासस्थावर २४ सप्टेंबर२०२४ रोजी बांधकाम कामगारांचा धडक मोर्चा धडकला या मोर्चात ३० हाजारा पेक्षा जास्त बांधकाम कामगार सहभागी झाले होते.व बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार सुद्धा हाजोरोंच्या संख्येने सहभागी झाले होते. व या मोर्चाच्या शिष्टमंडळा सोबत चर्चा करताना सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या व मंजूरही करण्यात आल्या आहेत.मंजूर करण्यात आलेल्या मागणी मध्ये दिवाळी सानुग्रह अनुदानाची मागणी अग्रभागी होती.या मागणीला १० ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीला मान्यता देण्यात आली. यांची अंमलबजावणी करण्यास कामगार मंत्री व इमारत व इतर बांधकाम कामगारांना कल्याणकारी मंडळाने सुरूवात केली आहे.यामुळे राज्यातील लाखो नोंदणीकृत बांधकाम कामगारांची दिवाळी गोड होणार आहे.या निर्णयाचा स्वागत लाल बावटा बांधकाम कामगार संघटना करते व हा निर्णय घेण्याल्यामुळे बांधकाम कामगारात उत्साहच वातावरण तयार झाले आहे. या लढ्यात सहभागी झालेल्या सर्व लढाऊ बांधकाम कामगारांच संघटना अभिनंदन करते. संघटनेने लढुन मिळवलेली हि बांधकाम कामगारांची मागणी आहे व ती मंजूर करण्यात आल्या बदल कामगारमंत्री व मंडळाचे धन्यवाद संघटना मानते .! या सर्व लढ्याच आंदोलनाच नेतृत्व लाल बावटा बांधकाम कामगार संघटना सिटु व इमारत व इतर बांधकाम कामगारांना फेडरेशन महाराष्ट्र राज्य सिटू लाल बावटा यांनी केले. यात बांधकाम कामगाराचे नेते बीड जिल्हा बांधकाम कामगारांना संघटना लाल बावटा चे जिल्हा अध्यक्ष कॉ.प्रा.बी.जी.खाडे जिल्हा उपाध्यक्ष कॉ.ओम पुरी यांनी हि मागणी सातत्याने लावून धरली व यशस्वी करून दाखवी. प्रत्येक आंदोलनात सहभागी असलेले सहकारी जालिंदर गिरी, प्रकाश वाघमारे, ,श्री.ज्ञानेश्वर आजबे, भागवत झाटे,अन्सार शेख, जावेद शेख, नितीन भैरट,हारिदास गिरी, शेख नविन ,गणेश चौधरी, अर्जुन सोळंके, नावेद मौजवान इ कार्यकर्ते व हाजारो बांधकाम कामगारांना सहभागी होते.

## विकासासाठी निधी कमी पडू

बाजुस दुतर्फा मजबुतीकरण, डांबरीकरण उर्वरीत सि.सि.नाली बांधकाम करण्यासाठी रू १७० लक्ष्य, कृष्णा ट्रॉली ते नरवय्ये यांच्या घरापर्यंत व्हाया वाघमोडे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रू ७० लक्ष्य, योगेश नगर येथे सी.सी.रस्ता बांधकाम करण्यासाठी रू ३० लक्ष्य, सेंट मैरी हायस्कुल ते गायत्री नगर रस्त्यावरील सिना नदीवरील पुलाचे बांधकाम करण्यासाठी रू ७० लक्ष्य, दत्त नगर येथे सुरोसे यांच्या घराजवळील सी.सी.रस्ता बांधकाम व भुमीगत नालीचे बांधकाम या कामासह इतर काम करण्यात येणार आहे

## एसटी आरक्षण अंमलबजाणीचा

समाजाला एसटी आरक्षणापासून जाणीपूर्वक वंचित ठेवले जात आहे. महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या वतीने गेल्या ७० वर्षांपासून एसटी आरक्षणाची लढाई लढली जात असताना प्रत्येक सरकारने धनगर समाजाची फसवणूक केलेली आहे. मात्र सध्यस्थितीत धनगर समाज आरक्षणाची धग वाढलेली असताना समाज आक्रमक होत असल्याचेही दिसून येत आहे. सध्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी धनगर आरक्षणासाठी मोर्चे आंदोलनांनी आक्रमक स्वरुप धारण केले असल्याचे दिसून येत आहे. उद्याच्या कॅबिनेट बैठकीमध्ये धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजाणीचा जीआर सरकाने काढावा अन्यथ: आगामी येवू घातलेल्या विधानसभा निवडणुकांधमध्ये धनगर समाज सरकारला नक्कीच आपली जागा दाखवून देणार असल्याचे दिसून येते. उद्याच्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजाणीचा जीआर काढावा यासाठी बीड येथील पुण्यश्लोक अहिल्यामाई होळकर चौकात ढोल बजाओ आंदोलन करून गेंड्याची कातडी पांघरलेल्या जागो करण्याचा प्रत्यन केला आहे. यावेळी या ढोल बजाओ आंदालनात अशोकराव गावडे, मोहन देवकते, भगवान माने, राजेंद्र गाडेकर, बाबुराव नप्ते, किरण गावडे, दिगंबर चादर, अमर ढोणे, चंद्रकांत भोंडवे, ॲड. राजू शिंदे,अभिमान घोंगडे, गणेश कोळेकर, लक्ष्मण मस्के, अंकुश गवळी, अमर वाघमोडे,दत्ता प्रभाळे, कालिदास पांढरे, विजय तांदळे, संजय लकडे, रामेश्वर श्रीराम, बंडु भोंडवे सह सकल धनगर समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी समाज आक्रमक होताना दिसून येत होते.

## भारतीय बौद्ध महासभेच्या

महासभा माजलगाव चे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते या कार्यक्रमासाठी पोलीस निरिक्षक आद राहुलजी सुर्यतळ,पी एस आय माकने साहेब,भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा सरचिटणीस शोभाताई भोजने ,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे,केंद्रीय शिक्षिका सिरसट ताई, वंचित बहुजन आघाडीचे नेते अंकुश आण्णा जाधव, उपस्तीत होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष एल आर मस्के सर यांनी केले या प्रसंगी बोलताना पोलीस निरिक्षक सुर्यतळ साहेब यांनी उपस्तीत उपासक उपासिका यांनी बालकावर पंचशीलेचे पालण करण्याचे संस्कार रूजवणे हि काळाची गरज आहे यातुनच आचरणशिल व सुसंस्कारीत उपासक निर्माण होईल असे प्रतिपादन केले या प्रसंगी भिमराव सिरसट व एस बी मोरे यांनी अशोका विजयादशमी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मक्रांती गतीमान कशी करावी ह्या विषयी विविध मुद्या द्वारे मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी पोटभरेआप्पा यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे,नितिन डोंगरे दयानंद साळवे,गुलाब धाईजे मोहन काकडे,संभाजी धाईजे चक्रधर पोटभरे,डी पी वाघमारे नाना,भानुदास साळवे, कालीदास साळवे, नागसेन जावळे,अशोक मगर,दिनेश निसर्गंध, नंदकिशोर निसर्गंध ,राजेभाऊ साळवे,शारदाताई तांगडे,वंदनाताई घनघाव अनुराधाताई साळवे,आशाताई मोरे ,मंडोदरीताई खंदारे,सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

## मातंग समाजाच्या संघटनांची

संशोधन आणि प्रशिक्षण संस्था बार्टीच्या धरतीवर सुरू झालेले लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (आर्टी ) डबघाईस आलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ त्याचबरोबर मुंबईतील *अण्णाभाऊंचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक, पुणे संगमवाडी येथील क्रांतीसुर्य लहुजी वस्ताद साळवे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक आणि अण्णाभाऊंना

या देशातील सर्वोच्च किताब भारतरत्न केंद्र सरकारने देऊन त्यांना सन्मानित करावे यासाठी राज्यातील मातंग समाज पराकोटीचा संघर्ष करत आहे समाजाच्या मान्य झालेल्या मागण्यांचे श्रेय घेण्यासाठी समाजातील तथाकथित नेत्यांची चढाओढ सुरू आहे

खरं वास्तव हे आहे की ज्यांना समाजामध्ये कवडीचे स्थान नाही त्यांनी संघटना आणि समाजाच्या, पक्षाच्या नावाखाली मातंग समाजाच्या दोन दोन पिढ्या खपविल्या समाजातील नव्याने निर्माण होत असलेल्या तरुणांना देशोधडीला लावले तेच नेते स्वतःच्या स्वार्थासाठी राजकीय पक्ष नेतृत्वाच्या पायाजवळ लाळ घोटत बसले आहेत हे दुर्दैव आहे

या सर्व गोष्टींना आळा घालण्यासाठी मातंग समाजाचे विकासाचं व्हिजन, व्यापक दृष्टिकोन ठेवून करण्यासाठी मातंग समाजाची दशा का झाली? आणि मातंग समाजाची दिशा काय असावी..!

*यासाठी महाराष्ट्रातील मातंग समाजाचे विचारवंत साहित्यिक लेखक सामाजिक चळवळीमध्ये काम करणारे अग्रेसर नेते आणि राज्यभरातील संघटनांचे प्रमुख यांच्या उपस्थितीमध्ये बीड या ठिकाणी व्यापक विचार मंथन परिषदेचे आयोजन करणार असल्याचे लक्ष्मण वाघमारे यांनी सांगितले.

## रमेश आडसकरांनी विजयादशमी

सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन उत्तम रांजवण,माजलगाव शहरातील सर्वात जुने व जेष्ठ डॉ.वारकरी,शहरातील प्रतिष्ठित डॉ.जुजगर,व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष अनंत रुद्रवार,शहरातील प्रतिष्ठित नागरिक ओमप्रकाश बजाज, उद्योजक सचिन बजाज,ज्येष्ठ नेते अमरनाथ खुरपे,शहरातील प्रतिष्ठित व्यापारी प्रकाश दुगड,सतीश दुगड,पत्रकार उमेश मोगरेकर,शिवसेना तालुकाध्यक्ष तुकाराम येवले,सुभाष नाकलगावकर, महिला मोर्चा अध्यक्षा गौरीताई देशमुख यांच्यासह अनेकांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. घेतल्या व विजयादशमीच्या शुभेच्छा देत आशिर्वाद घेतले.

# दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर कांद्याचे लिलाव सुरु

## नाशिकमध्ये प्रतिक्विंटल कांद्याला ६१६१ रुपयांचा दर

आज साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक असणारा दसऱ्याचा शुभमुहूर्त आहे. या सणाचा देशभरात उत्साह पाहायला मिळत आहे. दरम्यान, दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर नाशिकच्या उमराणा बाजार समितीमध्ये आज नवीन लाल कांद्याच्या लिलावाला सुरुवात झाली आहे. लिलावाच्या सुरुवातीच्या दिवशीच कांद्याला प्रतिक्विंटल ६१६१ रुपयांचा दर मिळाला आहे. उमराण्याच्या राजेंद्र देवरे यांच्या बैलगाडीला लिलावाचा मान मिळाला आहे. आज बाजार समितीच्या वतीनं त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. कसमादे परिसरातील मोठी बाजार असा नावलौकिक असलेल्या उमराणा बाजार समितीमध्ये दसऱ्याला नव्या लाल कांद्याच्या लिलावाचा सीमोल्लंघन करण्याची व मुहूर्ताला लाल कांद्याला जास्त भाव देण्याची परंपरा आहे. आज दसऱ्याचा मुहूर्त साधण्यासाठी बाजार समिती सुरू ठेवण्यात आली होती. उमराण्याच्या राजेंद्र देवरे यांच्या बैलगाडीला लिलावाचा मान मिळाला.बाजार समितीच्यावतीने त्याचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, कांद्याच्या वाढत्या दरामुळं शेतकऱ्यांना फायदा होत आहे.

### कांद्याच्या दरात चांगली वाढ

यंदा देशभरात चांगला पाऊस झाला आहे. सध्या परतीचा मान्सून देशातील अनेक भागात धुमाकूळ घालताना दिसत आहे. या पावसामुळं अनेक भागात शेती पिकांना फटका देखील बसला आहे. दरम्यान, सध्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अच्छे दिन आले आहेत. कांद्याच्या दरात चांगली वाढ झाली आहे. मात्र, दुसरीकडे ग्राहकांच्या खिशाला झल लागत असल्याचं बोललं जात आहे.



# अॅग्रिस्टॅक योजना महाराष्ट्रात राबविण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय



मुंबई : राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरिता केंद्र शासनाची अॅग्रिस्टॅक डिजिटल अॅग्रिकल्चर मिशन योजना राज्यात राबवण्याचा निर्णय झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या योजनेंतर्गत माहिती निर्मिती कक्ष, शेतकरी माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच आणि भूसंदर्भांकीत भूभाग असणारे गाव नकाशे माहिती संच महसूल विभाग तयार करेल. यासाठी माहिती वापर कक्षाची स्थापना कृषि विभाग करेल. यासाठी सुकाणू समिती, अंमलबजावणी समिती, क्षेत्रिय स्तरावर विभागस्तरीय, जिल्हास्तरीय समिती आणि तालुकास्तरीय समिती गठित करण्यात येतील. पिकांच्या माहिती संचासाठी तिन्ही हंगामात मिळून सुमारे ८१ कोटी ८३ लाख रुपये खर्च दरवर्षी येणार आहे.

# जनावरांना होणारा सांसर्गिक श्वसनलिकेचा आजार

सांसर्गिक श्वसनलिका दाह हा जनावरांच्यामध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य विषाणूजन्य आजार आहे. कमी वय असलेली जनावरे जास्त बळी पडतात. हरपिजविरीडी कुळातील बोव्हाईन हरपिज व्हायरस टाइप-१ या विषाणूमुळे हा आजार होतो.

प्रसार : आजारातून बऱ्या झालेल्या जनावरांमध्ये हा विषाणू सीआयडी आणि ट्रायजेमिनल गँगलियामध्ये अव्यक्त राहतो आणि पोषक वातावरण मिळाल्यानंतर वेळोवेळी व्यक्त होऊन स्त्रावाद्वारे शरीरातून बाहेर पडतो. बाधित जनावरांच्या शरीरातून अनुनासिक स्त्राव, खोकला, जननेंद्रियातील व गर्भाशयातील स्त्राव, वीर्य इत्यादी द्वारे विषाणू बाहेर फेकला जातो. दूषित हवेद्वारे आजाराचा प्रसार होतो. गोठविलेल्या वीर्यामध्ये या रोगाचे विषाणू जवळपास एक वर्षभरापर्यंत जिवंत राहू शकतात.

लक्षणे : ताप येतो.डोळ्यांचा दाह. नाकातून जास्तीचा स्त्राव बाहेर पडतो तसेच स्त्रावामुळे नाकपुड्या बंद होतात व श्वसनाचा त्रास होतो जनावरे तोंडाद्वारे श्वास घेऊ लागतात. श्लेषमल स्त्रावामुळे श्वासनलिका अरुंद होते. ब्रोंकोनीमोनियामुळे मृत्यू सुद्धा उद्भवू शकतो. विषाणूमुळे होणाऱ्या सांसर्गिक श्वसनलिका दाह या आजाराचा संसर्ग अगदी लहान वासरामध्ये सुद्धा सामान्य आहे. श्वसन संस्थेच्या सहभागाची कोणतीही लक्षणे नसलेली स्थिती तीव्र आणि सामान्यतः घातक ठरू शकते. हा आजार पश्च्युलार वोल्वो वजायनायटिस, क्वायटल एक्झांथेमा, वेसिक्युलर वेनेरियल डिसीज, वेसिकलर वजायनाइटिस इत्यादी नावाने सुद्धा ओळखला जातो. प्रामुख्याने म्हशींच्या व गायींच्या जननेंद्रियावर फोड येऊन जखमा होतात. रेड्याच्या किंवा बैलाच्या जननेंद्रियावर देखील जखमा होतात. जननेंद्रियाची श्लेष्मल त्वचा लाल गडद होते. त्यावर फोड येतात. संक्रमित रेड्याच्या/बैलाच्या वीर्यामधून विषाणू बाहेर पडत असले कारणाने अशा रेड्यांनी म्हैस भरवल्यास एक ते तीन दिवसांमध्ये म्हशीमध्ये आजाराची लक्षणे दिसण्यास सुरवात होते.



घातक परिणाम : सामान्यतः सांसर्गिक श्वसनलिका दाह आजारामध्ये श्वसनलिकेच्या संदर्भातील लक्षणे दाखविल्यानंतर गोठ्यामधील किंवा कळपातील ६० टक्के पर्यंत गाभण म्हशींमध्ये गर्भपात होऊ शकतो. गर्भपात हा गर्भधारणेच्या कोणत्याही टप्प्यावर होऊ शकतो. परंतु सर्वात जास्त वेळा तो तिसऱ्या तिमाहीत म्हणजेच ७ ते १० महिन्यात होण्याचा धोका असतो. संक्रमित रेड्याच्या/बैलाच्या वीर्यामधून विषाणू बाहेर पडत असले कारणाने अशा संक्रमित रेड्यापासून म्हैस भरवू नये.

प्रतिबंध उपाय : गोठ्यात नवीन जनावरे खरेदी करताना आयबीआर साठी चाचणी करावी.

ज्या जनावरामध्ये आयबीआरव्ही ची लागण नाही असेच जनावर खरेदी करावे. भारतामध्ये या आजाराच्या नियंत्रणासाठी लस उपलब्ध नाही.उपचार : आजाराची लक्षणे आढळताच ताबडतोब पशुवैद्यकाशी संपर्क साधून उपचार करावेत.

# धिंगरी अळिंबी लागवड तंत्रज्ञान

अळिंबी म्हणजे अॅगरिकस प्रवर्गातील आहारात अन्न म्हणून उपयोगी विशिष्ट प्रकारच्या बुरशीचे फळ आहे. या बुरशीची पुर्ण वाढ झाल्यानंतर त्याला फळे येतात व त्या फळांस अळिंबी किंवा भुछत्र असे म्हणतात तसेच इंग्रजीत मशरुम या नावाने ओळखले जाते. निसर्गामध्ये अळिंबीचे विषारी व बिनविषारी तसेच विविध आकार व रंगानुसार असंख्य प्रकार आहेत. त्यामुळे त्याचा खाण्यासाठी वापर करण्यापुर्वी ह्या खाण्यास योग्य आहेत किंवा नाहीत याची खात्री करुनच खावेत. अख्या जगाचा विचार केला असता जगभरात अळिंबीचे २००० प्रकार असून भारतात त्यापैकी २०० प्रकारांची नोंद केली आहे. वेगवेगळ्या देशात मिळून एकूण १०-१२ प्रकारांच्या अळिंबीची व्यावसायिक स्तरावर लागवड करण्यात येते. त्यापैकी भारतात बटण, धिंगरी, दुधी व भाताच्या पेढ्यांवरील अळिंबीची लागवड प्रचलित आहे. अनेक शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून कमी भांडवलात कमी खर्चात कमी वेळेत अशी आहारात उपयुक्त ठरणारी धिंगरी अळिंबी उत्पादन करतात. ज्याला शास्त्रीय भाषेत ऑयस्टर म्हणतात. हा प्रकार अळिंबीच्या प्लुरोटस कुळातील आहे. ज्याला शिंपला किंवा पावसाळी छत्री या नावानेही ओळखले जाते. धिंगरी अळिंबीस आहारात वैशिष्ठपुर्ण स्थान आहे. ओल्या धिंगरी अळिंबी मध्ये २.७८% प्रथिने, ०.६५% स्निग्ध पदार्थ, ५.२% कर्बोदके, ०.९७% खनिजे, १.०८% तंतुमय पदार्थ, ९०% पाणी तसेच खनिजांपैकी पालाश, स्फुरद, कॅल्शियम, लोह, सोडीयम इत्यादी घटक आहेत.

धिंगरी अळिंबीच्या जाती व वैशिष्टे : धिंगरी अळिंबीच्या रंग, रुप, आकारमान व तापमानाची अनुकुलता यानुसार प्रयोगशाळेत व निवड चाचणीद्वारे विकसीत केलेल्या भारतात व विशेषतः महाराष्ट्रात प्रचलित असणाऱ्या विविध जाती खालील प्रमाणे आहेत. प्लुरोटस साजोर काजु, प्लुरोटस इओस, प्लुरोटस प्लोरीडा, प्लुरोटस फ्लॅबीलॅटस, हिपसीझायगस अलमॅरीस.

धिंगरी अळिंबीच्या लागवडीची सुधारीत पद्धत : १) लागवडीसाठी जागेची निवड - धिंगरी अळिंबीच्या लागवडीसाठी अन्न, वारा, पाऊस यापासुन संरक्षण होईल अशा निवाऱ्याची गरज असते. पक्के किंवा कच्चे बांधकाम असलेली खोली किंवा शेड, अच्छादित असलेली झोपडी, बांबुच्या तट्ट्यापासुन तयार केलेली झोपडी किंवा पोल्ट्रीचे शेड वापरता येते. निवडलेल्या जागेस प्रखर सुर्यप्रकाश नसुन हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी २) लागवडीसाठी माध्यम - या अळिंबीची लागवड कुठल्याही पिष्टमय पदार्थ अधिक असणाऱ्या घटकांवर म्हणजे शेतातील पिकांच्या मळणीनंतर निरुपयोगी अश्या वाळलेल्या काडावर किंवा पालापाचोळ्यावर करता येते. यासाठी मुखतः भात, सोयाबीन, गव्हाचे काड, ज्वारी, बाजरी, मका याची व पाने, कणसे, भुईमुगाच्या शेगांची टरफले इत्यादींचा वापर करावा. ३) लागवडीसाठी वातावरण - लागवडीसाठी नैसर्गिक तापमान २२ ते ३० से. व हवेतील आर्द्रता ८५ ते ९०% असणे आवश्यक असते. म्हणून लागवडीच्या ठिकाणाचे तापमान व आर्द्रता यांचे नियंत्रण ठेवणेसाठी जमिनीवर तसेच हवेत चोहोबाजूंनी गोणपटाचे आवरण लावून त्यावर स्प्रे पंपाने पाणी फवारण्याची व्यवस्था करावी. साधारणः २५ से. तापमानास अळिंबीची वाढ होते. ४) लागवडीची पद्धत - लागवडीस लागणारे काड किंवा पालापाचोळ्याचे २-३ से.मी. लांबीचे बारीक तुकडे पोत्यामध्ये भरुन ६ ते ८ तास थंड पाण्यात बुडवून भिजत ठेवावे काडाचे पोते थंड पाण्यातुन काढुन त्यातील जास्त पाण्याचा निचरा करण्यासाठी १-२ तास तिवईवर ठेवावे.



५) काड निर्जंतुकीकरण - काड निर्जंतुकीकरणासाठी दोन पद्धती वापरल्या जातात. पहिली म्हणजे थंड पाण्यात भिजवलेल्या काडाचे पोते ८० से. तापमानाच्या गरम पाण्यात १ तास बुडवावे व नंतर गरम पाण्यातुन काढुन त्यातील जास्त पाण्याचा निचरा होण्यासाठी तिवईवर ठेवावे. किंवा काडाचे पोते ८० से. तापमानाच्या वाफेवर १ तास ठेवून निर्जंतुकीकरण करावे. काड थंड करण्यासाठी पोत्यासह सावलीत ठेवावे. दुसरे म्हणजे काड निर्जंतुकीकरणासाठी ७.५ ग्रॅम बाविस्टीन (बुरशीनाशक) व १२५ मिली फॉर्मेलीन (जंतुनाशक) १०० लीटर पाण्यात मिसळून त्यामध्ये वाळलेले काड पोत्यात भरुन १६ ते १८ तास भिजत ठेवावे. द्रावणातील काड पोत्याबाहेर काढून जास्त पाण्याचा निचरा करण्यासाठी ४ ते ५ तास ठेवावे व त्यानंतर हे काड ३५५५ से.मी. आकाराच्या ५ % फॉर्मेलीनमध्ये निर्जंतुक केलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये थर पद्धतीने भरावे. ५ % फॉर्मेलीनचे द्रावण फवारुन निर्जंतुक केलेल्या बंदीस्त जागेत हे काम करावे. काड भरताना प्रथम पिशवीच्या तळाला अळींबीचे थोडेसे बियाणे टाकावे. नंतर ८-१० से.मी. जाडीचा निर्जंतुक केलेल्या काडाचा थर द्यावा व त्यावर अळिंबीचे बियाणे (स्पॉन) पसरावे. बियाण्याचे प्रमाण ओल्या काडाच्या वजनाच्या २% असावे. काड व स्पॉन याचे ४ ते ५ थर भरावे. भरताना तळहाताने काड थोडेसे दाबावे. पिशवी भरल्यानंतर दोऱ्याने पिशवीचे तोंड घट्ट बांधावे, पिशवीच्या चहुबाजुने सुईने किंवा टाचणीने ४०-५० बारीक छिद्रे पाडावीत. या पिशव्या निवाऱ्याच्या जागेत ठेवल्यास पिशवीमध्ये पांढरट बुरशीची वाढ दिसुन आल्यावर या पिशव्या फाडुन टाकाव्यात. बुरशीची वाढ होण्यास १५ ते १८ दिवस लागतात. बुरशीमुळे काड एकमेकांना घट्ट चिकटवुन त्याला ठेपेचा आकार प्राप्त होतो. यालाच बेड असे म्हणतात. ६) पिकाची निगा - धिंगरीचे प्लास्टिक पिशवीतुन काढलेले बेड योग्य अंतराव रॅकमध्ये ठेवावे अथवा शिंके बांधुन टांगुन ठेवावे. बेडवर दिवसातुन २ ते ३ वेळा पाण्याची हलकी फवारणी करावी. खोलीमध्ये जमीनीवर भिंतीवर पाणी फवारुन तापमान २५० ते ३०० से व हवेतील आर्द्रता (६५ ते ७५ %) नियंत्रित करावी. ३ ते ४ दिवसात बेडच्या सभोवताली अंकुर (पीनहेड) दिसु लागतात पुढील ३ ते ४ दिवसात त्याची झपाट्याने वाढ होवून फळे काढणीस तयार होतात. ८ ते १० दिवसांनी दुसरे पीक मिळते व त्यानंतर ८-१० दिवसांनी तिसरे पीक मिळते. साधारणपणे १ किलो वाळवलेल्या काडाच्या एका बेडपासुन ८०० ग्रॅम ते १ किलो ताज्या अळिंबीचे उत्पादन मिळते. किडीचा बंदोबस्त करण्यासाठी काढणीनंतर प्रत्येक वेळी मॅलेथिऑन किंवा नुवान ०.०२ % (१० ली. पाण्यात २ मिली) या प्रमाणात फवारणी करावी. बेडवर फळे असताना किटकनाशके फवारु नये.

७) पाणी व्यवस्थापन - प्लास्टीक पिशवीतुन बेड काढल्यानंतर धिंगरी आळिंबी वाढीच्या काळात बेडवर दिवसातुन दोन-तीन वेळा पाण्याची लहान नोझल असलेल्या स्प्रे पंपाने हलकी फवारणी करावी. अळिंबीच्या बुरशीच्या वाढीच्या काळात पाणी फवारण्याची गरज नसते.

८) पिक संरक्षण - अळिंबी हे अतिशय नाजुक नाशवंत व अल्पमुदतीचे पिक आहे. सदर पिकावर ग्रीन मोल्ड व काळ्या छत्र्या हे दोन रोग येत असून शिरीड व फोरीड माशी या दोन किडी येतात, रोगांच्या नियंत्रणासाठी रुम व काड व्यवस्थित निर्जंतुक करणे गरजेचे आहे. तसेच किडींच्या नियंत्रणासाठी रुमच्या खिडक्यांना मच्छर जाळी लावणे व रुममध्ये इतरत्र कुठुनही माशी शिरणार नाही याची काळजी घ्यावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४६ : अमेरिकन डॉक्टर डॉ. जॉन वॉरेन यांनी शस्त्रक्रिया करताना भूल देण्यासाठी सर्वप्रथम इथर या रसायनाचा वापर केला.
१८७८ : एडिसन इलेक्ट्रिक लाईट कंपनीचे काम सुरू झाले.
१८८८ : गोपाळ गणेश आगरकरांच्या 'सुधारक' पत्राची सुरूवात
१९१७ : पहिले महायुद्ध जर्मनीसाठी हेरगिरी केल्याबद्दल डच नर्तिका माता हारी हिला पॅरिसजवळ गोळ्या घालून मृत्युदंड देण्यात आला.
१९३२ : टाटा एअरलाइन्सचे पहिले उड्डाण झाले. जे. आर. डी. टाटा यांनी हे विमान कराचीहुन मुंबई येथे आणले व नागरी विमानसेवेची सुरुवात केली. याच कंपनीचे पुढे राष्ट्रीयीकरण होऊन एअर इंडिया ही कंपनी अस्तित्त्वात आली.
१९३५ : टाटा एअरलाइन्सचे पहिले उड्डाण झाले. जे. आर. डी. टाटा यांनी हे विमान कराचीहुन मुंबई येथे आणले व नागरी विमानसेवेची सुरुवात केली. याच कंपनीचे पुढे राष्ट्रीयीकरण होऊन 'एअर इंडिया' ही कंपनी अस्तित्त्वात आली. (व पुढे तिचा बोर्‍या वाजताना आपण पाहतोच आहे)
१९६८ : हरगोविंद खुराणा यांना नोबेल पारितोषिक प्रदान.
१९७० : अन्वर सदत यांची मिस्त्र देशाच्या राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली.
१९७५ : बांगलादेशातील रहिमा बानू ही २ वर्षांची मुलगी ही देवी रोगाचा शेवटचा रुग्ण ठरली.
१९८४ : आर्च बिशप डेसमंड टुटू यांना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर.
१९८८ : उज्ज्वला पाटील ह्या संपूर्ण जगाची समुद्र यात्रा करणाऱ्या पहिल्या महिला बनल्या.
१९९३ : वर्णभेदामुळे निर्माण झालेला अविश्वास दूर करुन, दक्षिण अफ्रिकेत लोकशाही रुजवण्याच्या प्रयत्नांबद्दल अफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे नेते नेल्सन मंडेला आणि दक्षिण अफ्रिकेचे अध्यक्ष एफ. डब्ल्यू. डी. क्लर्क यांना शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार जाहीर
१९९७ : भारतीय लेखिका अरुंधती रॉय यांच्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीला साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'बुकर पुरस्कार' मिळाला.
१९९९ : जागतिक फ्रेड डेव्हिस पुरस्कार भारताच्या गीत सेठी यांना प्रदान.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४२ : बादशाह अकबर हिन्दुस्तानचा तिसरा मुघल सम्राट (मृत्यू: १२ आक्टोबर १६०५)
१६०८ : इव्हानजेलिस्टा टॉरिसेली इटालियन गणिती व पदार्थ वैज्ञानिक, हवादाबमापीचा () संशोधक (मृत्यू: २५ आक्टोबर १६४७)
१८८१ : पी. जी. वूडहाऊस इंग्लिश लेखक (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७५)
१८४१ : जपानचे पहिले पंतप्रधान इटो हिरोबुमी यांचा जन्म.
१९०८ : जे. के. गालब्रेथ कॅनेडियन-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ एप्रिल २००६)
१९२० : मारिओ पुझो अमेरिकन लेखक (मृत्यू: २ जुलै १९९९)
१९२६ : नारायण गंगाराम सुर्वे कवी (मृत्यू: १६ ऑगस्ट २०१०)
१९३१ : अवुल पाकिर जैनुलब्दीन उर्फ ए. पी. जे. अब्दुल कलाम वैज्ञानिक आणि भारताचे वे११ राष्ट्रपती, एकात्मिक क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचे जनक, पंतप्रधानांचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार, पद्मभूषण (१९८१), पद्मविभूषण (१९९०), भारतरत्न (१९९७). राष्ट्रपती होण्यापुर्वी 'भारतरत्न' हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळालेले ते भारताचे तिसरे राष्ट्रपती आहेत. याआधी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (१९५४) आणि डॉ. झाकिर हुसेन (१९६३) या भारतरत्न मिळालेल्या व्यक्ति पुढे राष्ट्रपती झाल्या.
१९३४ : एन. रामाणी कर्नाटिक शैलीचे बासरीवादक
१९४९ : प्रणोय रॉय पत्रकार, एन. डी. टी. व्ही. चे संस्थापक
१९५२ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व छत्तीसगड राज्याचे पूर्व दुसऱ्या क्रमांकाचे मुख्यमंत्री रमण सिंह यांचा जन्मदिन.
१९५५ : भारतीय फील्ड हॉकी खेळाडू कुलबुर भौर यांचा जन्म.
१९५७ : मीरा नायर भारतीय वंशाच्या अमेरिकन चित्रपट निर्मात्या व दिग्दर्शिका
१९६९ : पं. संजीव अभ्यंकर मेवाती घराण्याचे शास्त्रीय गायक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७८९ : रामचंद्र विश्वनाथ तथा रामशास्त्री प्रभुणे उत्तर पेशवाईतील प्रामाणिक, निष्पक्षपाती, निर्भीड आणि प्रसिद्ध न्यायाधीश, पुणे दरबारात १५७१ मधे त्यांची शास्त्री म्हणून नेमणूक झाली. थोरले माधवराव जेव्हा पेशवे झाले तेव्हा रामशास्त्री सरन्यायाधीश होते. (जन्म: ? ? १७२०)
१७९३ : फ्रेंच राज्यक्रांती फ्रान्सचा राजा लुई (सोळावा) यांची विधवा पत्नी मेरी अँटोनिएत हिचा गिलोटीनवर वध करण्यात आला.
१८९६ : स्वातंत्र्यसैनिक, लोकसभेचे हंगामी सभापती सेठ गोविंद दास यांचा जन्म.
१९१७ : माता हारी पहिल्या महायुद्धात गाजलेली डच नर्तिका, सौंदर्यवती व गुप्तहेर (जन्म: ७ ऑगस्ट १८७६)
१९१८ : साई बाबा (जन्म:)
१९३० : हर्बर्ट डाऊ अमेरिकन उद्योगपती (जन्म: २६ फेब्रुवारी १८६६)
१९४४ : ओगले काच कारखान्याचे एक संस्थापक गुरुनाथ प्रभाकर ओगले यांचे निधन.
१९४६ : हर्मन गोअरिंग जर्मन नाझी (जन्म: १२ जानेवारी १८९३)
१९६१ : सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' हिन्दी साहित्यिक. त्यांनी ४४ ग्रंथ लिहिले. कन्येच्या मृत्यूनंतर त्यांनी लिहिलेल्या 'सरोजस्मृती' या शोकगीताची हिन्दीतील सर्वश्रेष्ठ विलापिकांमध्ये गणना होते. (जन्म: २१ फेब्रुवारी १८९६)
१९८१ : इस्त्रायली सेना प्रमुख व परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री मोशे दायान यांचे निधन.
२००२ : वसंत सबनीस लेखक व पटकथाकार (जन्म: ६ डिसेंबर १९२३)
२०१२ : कंबोडिया देशाचे पहिले पंतप्रधान नॉरदॉम सिहानोक यांचे निधन. (जन्म: ३१ ऑक्टोबर १९२२)

# भ्रष्टाचारी सत्ताधाऱ्यांना खुर्चीतून खाली खेचा -डॉ.फौजिया खान

## लोकसभेला झाले तसेच विधानसभा निवडणुकीत परिवर्तन होणार – राजेभाऊ फड

परळी। प्रतिनिधी

विजयादशमीचा दिवस हा अत्यंत चांगला दिवस संपर्क कार्यालयाच्या उद्धाटनासाठी निवडला आहे. गुंडगिरीवर सभ्यतेचा विजय, भ्रष्टाचारावर विकासाचा विजय, अनितीवर नीतीचा विजय आणि अनिष्ट गोष्टीवर सत्याचा विजय. मागील लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांना मतदारांनी त्यांची जागा दाखवून दिली आहे. आता सर्वसामान्य मतदारांचे, नागरिकांचे दिवस आले आहेत. राज्यातील युवक परिवर्तनाच्या मानसिकतेत आहेत. आगामी निवडणुकीत पक्षाच्या कार्यकर्त्यांना मेहनत घ्यावी लागेल, घरी बसून चालणार नाही. विरोधकांना आणि सत्ताधाऱ्यांना ऐन निवडणुकीच्या तोंडावर जनतेचा पुळका येऊ लागला आहे. बहिणीचा आणि शेतकऱ्यांचा कळवळा येऊ लागला आहे. मात्र या सर्व हवेतल्या योजना आहेत. शासनाच्या तिजोरीत पैसा नाही, राज्याला कर्जाच्या खाईत या शासनाने नेऊन ठेवले आहे. प्रगतीच्या मार्गावरील राज्याला अधोगतीकडे आणले आहे. टक्केवारीचे प्रकार आपल्याला थांबवायचे आहेत. पालकमंत्र्यांना माझा प्रश्न आहे की, तुम्ही स्वतः कृषिमंत्री असताना देशात सर्वाधिक आत्महत्या तुमच्याच जिल्ह्यात का? याचे खरे कारण म्हणजे इथला भ्रष्टाचार आहे. याला तुम्हीच तर खतपाणी घातले आहे असा घणाघात डॉ.फौजिया खान यांनी धनंजय मुंडे यांच्यावर केला. मतदारसंघात




रस्ते व्यवस्थित नाहीत, शेतकऱ्यांचे आणि माता भगिनिंचे हाल आहेत. आहे ते सरकार फक्त लुटण्याच्या धुंदीत आहे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात या भ्रष्टाचारी शासनाने प्रचंड लूट चालवली असून ही बाब अतिशय दुर्दैवी आहे. निवडणुकीच्या तोंडावर हे शासन योजनांचा पाऊस पडत आहे मग यागोदर त्यांनी काय केले? असा सवाल करीत त्या म्हणाल्या की, म्हणून पुढील विधानसभा निवडणुकीत त्यांना सत्तेच्या खुर्चीतून खाली खेचायचे आहे असेही त्या म्हणाल्या. युवा नेते राजेभाऊ फड यांच्या वतीने परळी वैजनाथ येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांच्या विधानसभा संपर्क कार्यालयाचा शुभारंभ आणि भव्य कार्यकर्ता मेळावा विजयादशमीच्या मुहूर्तावर पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमास पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.फौजिया खान यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राजेभाऊ फड यांनी त्यांचे स्वागत आणि सत्कार केला. तद्नंतर मतदारसंघातील अनेक गावांतून आलेल्या आणि शहरातील शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश सोहळा संपन्न झाला. प्रवेश केलेल्या सर्वांच्या गळ्यात पक्षाचा रुमाल टाकून सर्वांचे स्वागत करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजीने परिसर दणाणून सोडला होता. तालुक्यातील वाघाळा, कावळ्याची वाडी येथील नागनाथ सलगर, सौरभ सलगर यांच्यासह शेकडो जणांनी प्रवेश केला तर परळी शहरातील एकमीणार चौक तसेच वाल्मिकी नगर येथील शेख हसन, शेख इक्बाल यांच्यासह अनेकांनी तर सावता माळी आणि गणेशपार भागातील परमेश्वर ठाकरे यांच्यासह शेकडो जणांनी प्रवेश केला. याबरोबरच येळंब येथील मुलुख मैदानी तोफ संगीता होळंबे, शहरातील रेखाताई कांबळे, नागापूर येथील सतीश सोनटक्के यांचाही जाहीर प्रवेश झाला तर मलिकपुरा भागातील पठाण नोमन यांच्या नेतृत्वात ४०० कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. याच कार्यक्रमात बोलतांना युवा नेते राजेभाऊ फड म्हणाले की, पक्षात काम करीत असताना पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या जिल्ह्यातील जनतेने मागील लोकसभेला परिवर्तन घडवून आणले. त्याचप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीत जो उमेदवार पक्षाकडून दिला जाईल तोच आमदार म्हणून निवडून येणार आहे. पक्षासाठी आम्ही पूर्ण ताकदीने मैदानात उतरून काम करणार आहोत. विद्यमान पालकमंत्री यांना सभा घेऊन जनतेची माफी मागावी लागली. या मतदार संघातील अनेक कामांत कोट्यवधी रुपयांचा त्यांनी भ्रष्टाचार केला. भुयारी गटार योजना खाऊन टाकली, शेतकऱ्यांचा पिक विमा आणि अनुदान खाऊन टाकले, रस्ते विकासातील निधी हडप केला. याची आगामी काळात त्यांना परतफेड करावी लागणार आहे. पवार साहेबांनी त्यांना आमदार केले, मंत्री केले, जे जे हवे ते ते दिले मात्र त्यांनीच धोका दिला. नाद कोणाचाही करा मात्र शरद पवारांचा करू नका. पालकमंत्र्यांनी फक्त मैदानात यावे त्यांना शरद पवारांची ताकद काय असते हे दाखवल्याशिवय राहणार नाही असा इशारा राजेभाऊ फड यांनी आपल्या भाषणातून दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहराध्यक्ष ऍड.जीवनराव देशमुख यांची उपस्थिती होती तर व्यासपीठावर ज्येष्ठ नेते अब्दुल समद, तालुकाध्यक्ष शंकर शेजुळ, ओबीसी विभाग तालुकाध्यक्ष एच. यु.फड, शहराध्यक्ष अशोकराव मुंडे, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष वर्षाताई रायभोळे, युवा नेते सोपानराव तोंडे, युवा शहराध्यक्ष सय्यद फिरोज, कार्याध्यक्ष महेबुब कुरेशी,युवती तालुकाध्यक्ष दिपाली सावंत, शहराध्यक्ष अश्विनी सरवदे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष श्रीदेवी शिंदे, शहर सचिव सविता नंदगवळी, सौ.अश्विनी सोळंके यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## शेतकरी विरोधी सरकारच्या विरोधातील मोर्चा निघाला बीडला




धारूर। प्रतिनिधी

नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना विमा नाही, अनुदान नाही. कठीण परिस्थितीत कसबस पिकविलेल्या शेतमालाला भाव नाही. चौहीकडून शेतकऱ्यांचा गळा घोटणाऱ्या सरकारचा दशक्रिया विधी तेलगाव येथे करण्यात आला असून चौदावा बीड येथे करण्यासाठी किसान सभेच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी बीडच्या दिशेने प्रवास सूरू केला आहे, अशी माहिती किसान सभेचे बीड जिल्हा अध्यक्ष कॉ. अजय बुरांडे यांनी दिली.

शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या सरकारच्या विरोधात किसान सभेच्या वतीने तेलगाव येथे गेल्या दहा दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. शेतकरी या सरकारच्या धोरणामुळे व नैसर्गिक संकटाने पूर्णपणे कोलमडला आहे. अशा संकटात शेतकऱ्यांना विम्याचा आधार मिळणे हा शेतकऱ्याचा हक्क आहे. पण वीमा योजनेतून शेतकऱ्यांना आधार देण्या ऐवजी विमा कंपन्यांचे व राजकीय दलालांचे खिसे भरण्यात सरकारला जास्त रस आहे. त्यामुळे विमा दिल्याच्या नुसत्या घोषणा केल्या जात आहेत. तुम्ही विमा दिला म्हणता मग त्या लाभार्थी शेतकऱ्यांची यादी मात्र दिली जात नाही. अनुदान वाटपाच्या घोषणा केल्या जात आहेत.

मात्र शेतकऱ्यांच्या पदरात काही पडत नाही. शेतमालाचे भाव तर या वर्षी पार रसातळाला गेले आहेत. हमी भावापेक्षा खूप कमी भाव व्यापारी देत आहेत. खरेदी केंद्र सुरू करण्याच्या फक्त थापा मारल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर किसान सभेने ९ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चार दिवस धरणे आंदोलन केले जिल्हाधिकारी यांनी लेखी दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करा म्हणून गेली दहा दिवस तेलगाव येथे धरणे आंदोलन केले. मात्र मुर्दाड सरकारने त्याकडे सपसेल दुर्लक्ष केले. अखेर संतप्त शेतकऱ्यांनी अशा मुर्दाड सरकाचा दशक्रिया विधी तेलगाव येथे केला.

सरकारच्या नावे किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी मुंडन करून चौदावा करण्यासाठी शेतकरी पायी चालत बीडच्या दिशेने निघाले आहेत. १३ ऑक्टोबर रोजी तेलगाव येथून चालत निघून १६ तारखेला हे शेतकरी बीड येथे पोहचतील या प्रवासात जागोजागी सरकारच्या चुकीच्या धोरणाचा विरोध आणि हक्काच्या लढाईचा एल्गार करत किसान सभेचे हे शेकडो शेतकरी पुढचं पाऊल टाकत आत्ता बीड गाठत आहेत.

पुढे हे आंदोलन अधिक तीव्र होऊन जिल्हाभरातून प्रचंड प्रतिसाद मिळण्याचे संकेत दिसत आहेत.या आंदोलनासाठी दत्ता काका डाके,अजय बुरांडे,मुरलीधर नागरगोजे, जगदीश फरताडे,भगवान बडे, कडभाने, ब्राम्हनंद देशमुख, विष्णूपंत देशमुख, कृष्णा सोळंके, सुभाष डाके, अशोक डाके, काशीराम सिरसाट, ऍड.चोले, दादासाहेब सिरसाट आदींनी परिश्रम घेतले. खासदार बजरंग सोनवणे यांनी भेट देऊन सोबत असण्याचा शब्द दिला.रामराव लगड (माजी शिक्षण अधिकारी) यांनी पाठिंबा दिला.विठ्ठल लगड आणि संपूर्ण तेलगाव ग्रामस्थ यांनी सहकार्य केले.

## निवडणुकीच्या तोंडावर उद्‌घाटनांची नौटंकी – ॲड.जाधव

आष्टी । प्रतिनिधी

पाच वर्ष सर्व सामान्य जनतेची दिशाभूल करून आता निवडणूक तोंडावर आली असताना जनतेची सहानुभूती मिळवण्यासाठी प्रस्तापित पुढाऱ्याकडून आता कोटी कोटी रुपयांची विकास कामे आणल्याचे दावे केले जात आहेत. त्यातही मी आणले की तु आणले अशी कोंबडयासारखी झुंज लागली असून, निधी उपलब्ध नसतानाही नुसत्या मंजुरीवरच विकास कामांचे उद्धाटनाचे नारळ फोडण्याचे काम सुरु झाले असून, केवळ जनतेची सहानुभूती मिळून आपण किती कामाचे आहोत हे दाखवून देण्याची स्पर्धा सद्या आजी माजी आमदारामध्ये सुरू असून, केवळ श्रेयवादासाठी उद्धाघाटने केली जात आहेत. त्यामुळे अशा नौटंकीबाजाना आता जनतेनी घरी बसवावे असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या विधी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड नरसिंह जाधव यांनी केले आहे.



शरद पवारांचे कट्टर समर्थक म्हणून बीड जिल्ह्यात ओळख असलेले पाटोदा पंचायत समितीचे सभापती राहिलेले स्व. ॲड. लक्ष्मणराव जाधव यांचे सुपुत्र आणि उच्च न्यायालयातील ॲड. नरसिंह जाधव हे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून, त्यांनी गेल्या वर्षभरापासून मतदार संघातील गावागावांमध्ये दौरे सुरू केले आहेत. फक्त शरद पवाराचे एकनिष्ठ कार्यकर्ता हीच ओळख असलेल्या ॲड. नरसिंह जाधवाच्या उमेदवारीला आष्टी मतदार संघातून उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ॲड जाधव यांनी आष्टी तालुक्यातील आष्टी,कडा, धानोरा, धामणगाव, शेरी बु., टाकळी अमिया,फत्तेवडगाव, पिंपरी घु. आनंदवाडी, बीडसांगवी, गणगेवाडी, देवीनिमगाव गावाचा दौरा केला. या दौऱ्यात लोकांकडून सर्व सामान्य कार्यकर्ता म्हणून ॲड. जाधव यांना गावागावातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. यावेळी लोकांशी चर्चा करताना ॲड. नरसिंह जाधव यांनी सांगितले की, आज आष्टी मतदार संघात आतापर्यंतच्या नेतृत्वाने केवळ आपले आणि आपल्या बगल बच्याचे घरे भरुन सर्व सामान्य जनतेची पिळवणूक केली आहे. आज मतदार संघात भ्रष्टाचार आणि दहशतीचे वातावरण आहे. शासकीय योजना मंजूर करून आणायच्या आणि कागदोपत्री योजना राबवून शासकिय पैसा आपल्या खिशात घालायचं हेच धोरण राबविले जात आहे. या विरोधात कुणी आवाज उठविला तर त्याला दाबण्यसाठी जोर जबरदस्ती करून आवाज दाबला जातो. मात्र आपण या विरोधात आवाज उठविला. शासकीय योजनामधील भ्रष्टाचाराविरुद्ध जनहित याचिका दाखल करण्यात येऊन भ्रष्टाचार रोखण्यासाठी प्रयत्न केले असल्याचे सांगून ही भ्रष्ट, दहशत संपविण्यासाठी आपण निवडणूक लढवीतअसून, सर्व सामान्य जनतेची वकिली करण्यासाठीं जनतेच्या न्यायालयात उतरलो असल्याचे ॲड. जाधव यांनी सांगितले.

## पत्रकार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. चिंचोलकर तर उद्‌घाटक एस. एम. देशमुख

### स्वागताध्यक्षपदी क्रिडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

उदगीर। प्रतिनिधी

येथील रंगकर्णी साहित्य ,कला ,क्रिडी प्रतिष्ठानच्या वतीने २० ऑक्टोबर २०२४ रोजी होऊ घातलेल्या पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संम्मेलनाच्या अध्यक्षपदी आहिल्यादेवी होळकर होळकर विद्यापीठाचे वृतपत्र माजी विभाग प्रमुख जेष्ट पत्रकार डॉ. रविंद्र चिंचोलकर यांची तर उद्धाटक म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. या समेलनायच्या स्वागताध्यक्षपदी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री यांची निवड करण्यात आल्याची माहिती मुख्य संयोजक बिभीषन मद्देवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आली.पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संम्मेलनाचे आयोजन २० आक्टोबर रोजी शहरातील रघुकुल मंगल कार्यालयात एक दिवसाचे संम्मेलन पार पडणार आहे.



रविवारी (ता.२०) रोजी सकाळी ८.३० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासुन संविधान दिंडीने समेलनाची सुरुवात होणार असून, १०. ३० वाजता मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या हस्ते संमेलनाचे उद्धाटन होणार आहे. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे वृत्तपत्र विभागाचे प्रमुख तथा जेष्ट पत्रकार डॉ. रवींद्र चिंचोलकर,तर स्वागताध्यक्ष तथा प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे लोकप्रिय कॅबिनेट मंत्री ना. संजय बनसोडे उपस्थित राहणार आहेत. या समेलनानात परिसंवाद,न्युसलेस कवितेची काव्यमैफील , कविसंम्मेलन, विविध चॅनलचे वृतनिवेदक चर्चा सत्रा मध्ये सहभागी होणार असून यावेळी पत्रकारीता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना राज्यस्तरीय पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या सह अनेक कार्यक्रम आयोजित केले जाणार असल्याचेही राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलनाचे मुख्य आयोजक प्रा.बिभिषण मद्देवाड, सुनिल हावा पाटील, अर्जुन जाधव, श्रीनिवास सोनी, सिद्धार्थ सुर्यवंशी, नागनाथ गुट्टे,सचिन शिवशेट्टे यांच्या कडून सांगण्यात आले.

## अपशब्द बोलणाऱ्यावर कारवाईसाठी माजलगावात धरणे आंदोलन




माजलगाव। प्रतिनिधी

माजलगावात कुल जमाती तंजीम तर्फे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले असे की प्रेषित मुहम्मद पैगंबर (स.)हे मुस्लिम धर्मीयांसाठी आपल्या जिवा पेक्षाही मोठे आहेत

जसे जसे निवडणूकीचे वारे वाहत आहे तसे तसे काही बांडगूळ हिंदू – मुस्लिम धर्मीयां मध्ये वाद निर्माण करुन दगंली घडावे या साठी गेल्या काही दिवसापासून काही नालायक प्रर्वतीचे लोक प्रयत्न करत आहेत,

प्रेषिता बदल नेहमीच खोटी माहिती पसरवून अपशब्द बोलत आहेत मग तो सरला बेट चा रामगिरी असो की मुस्लिम धर्मीयां बदल वादग्रस्त वक्तव्य करणारा नितेश राणे असो किंवा तो उत्तर प्रदेश चा यती नरसिंहानंद अश्या दुष्ट प्रवृत्तींचा लोकांना शासनाने वेळीच कडक कायदे करून अतंर्गत अटक करून जन्मठेपेची शिक्षा देण्यात यावी जेणेकरून कोणत्याही धर्माच्या महापुरुषा बदल अपमान कारक बोलण्याची हीमत कुणीही करु नये व वक्फ दुरुस्ती अधिनियम २०२४ रद्द करण्यात यावे या मागण्यांसाठी उपविभागीय कार्यालय माजलगाव येथे धरणे आंदोलन करुन सर्व मुस्लिम समाज तर्फे उपविभागीय अधिकारी यांना या मागण्यांचा निवेदन देण्यात आले

**जाहीरनामा**

**धारुर येथील श्रीमती ए.बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २९९/२०२४ पंडित व इतर २ वि. निरंक**

अर्जदार यांनी मयत क्र. १. उमाकांत पिता भागवत साखरे मौजे तांदळवाडी ता. धारुर जि. बीड हे दिनांक १५/०१/२०२४ रोजी विवेकानंद हॉस्पीटल लातूर ता. जि. लातूर येथे मयत झाल्याचे तसेच मयत क्र. २. कुसुम प्र. उमाकांत साखरे मौजे तांदळवादी ता. धारुर जि. बीड हया दिनांक १७/०३/२०२३ रोजी तांदळवाडी ता. धारुर जि. बीड येथे मयत झाल्याचे नमूद केले आहे.त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ पंडीत पिता उमाकांत साखरे, वय ३७ वर्षे, धंदा शेती रा. तांदळवाडी ता. धारुर जि. बीड, अर्जदार क्र. २ दिपक पिता उमाकांत साखरे, वय: ३३ वर्षे, धंदा नौकरी रा. सदर ह.मु. न्यू.एस.टी. कॉलनी, सिडको एन २ औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद, अर्जदार क्र.३ संगीता भ्र. ज्ञानेश्वर पवार, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम रा. गांधी बाग रोप वाटीका, वन वसाहत, जि.एस. कॉलेज जवळ, सिव्हील लाईन वर्षा ता. जि. वर्धा यांनी अर्जदार क्र. १ व २ हे मयत क्र. १ व मयत क्र. २ यांची मुले आणि अर्जदार क्र. ३ ही मयत क्र. १ व मयत क्र. २ यांची मुलगी या नात्याने त्यांना शासकीय, निमशासकीय व इतर आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयत क्र. १. उमाकांत पिता भागवत साखरे व मयत क्र. २. कुसुम प्र. उमाकांत साखरे यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत क्र. १. उमाकांत पिता भागवत साखरे व मयत क्र. २. कुसुम भ्र. उमाकांत साखरे यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ११/१०/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : १८/११/२०२४

स्वाक्षरित
सी.के.पवार
क. लिपिक

शिक्का

स्वाक्षरित
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर धारूर

## राजश्री धनंजय मुंडे यांनी तेली समाज महोत्सवात दांडियाचा घेतला आनंद

### तेली समाज दांडिया महोत्सवात राजश्री मुंडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण

परळी। प्रतिनिधी

महिला या दुर्गाचे रुप आहे, महिलांच्या कला गुणांना वाव देण्याची नवरात्रोत्सव सारख्या कार्यक्रमांची गरज आहे, नवरात्रोत्सव म्हणजे चांगल्या विचाराचा वाईट विचारावर विजय मिळवण्याचे प्रतिक असल्याचे प्रतिपादन सौ. राजश्री धनंजय मुंडे यांनी केले.त्या तेली समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दांडिया महोत्सवात बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलत होत्या.

येथील वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात तेली समाजाच्या वतीने तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या दांडिया महोत्सवात शेवटच्या दिवशी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या सुविद्य पत्नी सौ. राजश्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. दांडिया मध्ये महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी होममिनीस्टर,




देवीचे कथा कथन, संगीत खुर्ची, लहान मुलींचे डान्स, आनंद नगरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. या विविध स्पर्धेतील विजेत्या नवदुर्गांना सौ.राजश्री मुंडे व बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यामध्ये फ्रिज,ओहन, सोन्याची, नथ, पैठणी,ब्लूटूथ, हेडफोन आदि बक्षिसे देण्यात आली. पुढे बोलताना राजश्री मुंडे म्हणाल्या की, तेली समाजातील महिलांसाठी जे व्यासपीठ निर्माण करुन दिले आहे त्याबदल पवन फुटके व सर्व आयोजक युवकांचे अभिनंदन, या दांडिया महोत्सवाची परंपरा कायम सुरू राहण्यासाठी आवश्यक ती मदत देण्यात येईल. यावेळी राजश्री धनंजय मुंडे यांनी समाजातील महिलांबरोबर दांडियाचा आनंद घेतला, स्पर्धेचे परिक्षण करणारे अनंत मुंडे,प्रा डॉ रागिणी पाध्ये, पुजा उपाध्ये, रजनी दहिफळे यांच्यासह विश्वजित मुंडे, उद्योजक विशाल आघाव, किशनराव मामडे, शुभम पुरभय्ये, शिवशंकर जठार, वैजनाथ बेंडे, कृष्णा बेंडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, माजी नगरसेविका प्राजक्ता श्रीकृष्ण कराड उपस्थित होत्या. कार्यक्रमास महाराष्ट्र प्रांतीक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, कोलूघाणा सोसायटीचे अध्यक्ष सुरेश लांडगे, बेलवाडी मंदिर ट्रस्टचे विश्वस्त शिवकुमार व्यवहारे, राजेंद्र सोनी, छगन क्षिरसागर, चंद्रशेखर फुटके, मलिकार्जुन साखरे, नागनाथ आप्पा भाग्यवंत, प्रा मधुकर शिंदे, अतुल बेंडे, शिवशंकर जठार, तेली समाज दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष युवक नेते पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, गंगाधर क्षिरसागर, गजानन बेंडे, राजकुमार भाग्यवंत, सचिन लासे, सतिष फुटके, ईश्वर राऊत, सुनील क्षिरसागर, दिपक साखरे, रवी अन्नपुर्णे, शंकर कौले, ईश्वर जठार, प्रकाश नकाते, ओंकार नाईक, प्रसाद जठार उपस्थित होते.

# भगवान भक्ती गड आणि नारायणगड येथील मेळाव्यामध्ये सुरेश धस यांनी लावली हजेरी

**आष्टी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र नारायण गडावर मनोज जरांगे पाटील आणि भगवान भक्ती गडावरील पंकजा मुंडे यांचा दसरा मेळावा पार पडला या दोन्ही मेळाव्यामध्ये माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी हजेरी लावली आष्टी तालुक्यातील अनेक उद्घाटन समारंभ साठी उपस्थित राहून अगोदर त्यांनी नारायण गडाच्या पायथ्याशी जाऊन नगद नारायण महाराजांच्या चरणस्पर्श करून नगद नारायण महाराजांचे आशीर्वाद घेतले आणि



त्यानंतर थेट सावरगाव येथील भगवान भक्ती गडावरील आ.पंकजा मुंडे आयोजित करीत असलेल्या दसरा मेळाव्या मध्ये सहभागी झाले पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे भाषण सुरू असताना ते व्यासपीठावर पोहोचले पंकजाताई मुंडे यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच व्यासपीठावरील



आ. मोनिका राजळे आ.मेघना बोर्डीकर साकोरे आ. नमिता मुंदडा माजी खासदार सुजय विखे पाटील माजी राज्यमंत्री सुरेश धस माजी आमदार शिवाजीराव कर्डिले आणि माजी आमदार भीमराव धोंडे माजी आमदार महादेव जानकर यांचा उपस्थितीबद्दल गौरवपूर्ण उल्लेख केला.

# कडा येथील शिवसंग्रामच्या आढावा बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहा - ज्ञानेश्वर चौधरी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्या अनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आला असून सर्वच नेते आपल्या पक्ष संघटनेचा आढावा घेत आहेत. ठिकठिकाणी दौरे, बैठका आणि मेळावे आयोजित केले जात आहेत. शिवसंग्राम सुध्दा डॉ.ज्योतिताई मेटे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकणार असल्याचे ज्ञानेश्वर चौधरी यांनी प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले.



पुढे बोलताना चौधरी म्हणाले की, गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून लोकनेते स्व.विनायक मेटे यांनी हयातभर बहूजन समाजाच्या प्रश्नासाठी विधानपरिषदेत प्रश्न मांडीत असत,जगाला हेवा वाटेल असे भव्यदिव्य छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात पाहिजे यासाठी त्यांनी अनेक वेळा सभागृह सुध्दा बंद पाडले आणि त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय मराठा समाजाला आरक्षण ते मिळवण्यासाठी त्यांनी म्हणून शेवटच्या श्वासापर्यंत लढा दिला,विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सभागृहाबरोबर रस्त्यावरची लढाई सुद्धा लढले अशा लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांचा वसा आणि वारसा व आदर्श पुढे घेऊन डॉ.ज्योतीताई मेटे सध्या राज्यात काम करीत आहेत. म्हणून आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कडा येथे शिवसंग्रामचा आढावा बैठक आयोजित केली आहे या बैठकीत विधानसभेच्या संदर्भात पुढील रणनिती काय असेल याचे मोलाचे मार्गदर्शन मिळणार आहे यासाठी प्रमुख उपस्थिती प्रभाकर अप्पा कोलंगडे, नारायण दादा काशीद म्हणून लाभणार आहे. म्हणून यांचे विचार ऐकण्यासाठी आढावा बैठकीला तालुक्यातील बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन चौधरी यांनी केले आहे.

# लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेच्या आंदोलनास यश

## नोंदणीकृत बांधकाम कामगारांना दिवाळी सानुग्रह अनुदान ५००० रू मंजूर..!

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटना लाल बावटा* व इमारत व इतर बांधकाम कामगारांना फेडरेशन महाराष्ट्र राज्य सिटू लाल बावटा च्या वतीने सातत्याने गेली ३ तीन वर्षांपासून आंदोलन व मोर्चाच्या आणि पाठपुराव्याच्या माध्यमातून हि दिवाळी सानुग्रह अनुदानाची मागणी लावून धरलेली होती व यासाठी राज्य भरात दि.१० ऑक्टोबर २०२२ रोजी मोर्चा



काढण्यात आला. त्यानंतर ८ ऑगस्ट २०२३ रोजी या मागणीला घेऊन मोर्चा काढण्यात आला. व नंतर ११ सप्टेंबर २०२३ ला मंत्रालयात लाल बावटा बांधकाम कामगारा संघटनेच्या शिष्टमंडळा सोबत झालेल्या बैठकीत कामगारमंत्री यांनी तत्वतः मागणी मान्य केली पण तिची अंमलबजावणी केली नाही.त्यामुळे पुन्हा एकदा २०२४ ला लाल बावटा बांधकाम संघटनेच्या पान ३ वर

# एसटी आरक्षण अंमलबजाणीचा जीआर काढण्यासाठी ढोल बजाओ आंदोलन

## जिल्ह्यातीन धनगर समाज एकवटला : घोषणाबाजीने परिसर दणाणला, अंमलबजावणी न झाल्यास मोठे आंदोलन

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्रातील धनगर समाजाचे एसटी आरक्षण अनुसुचित जमाती अंमलबजावणीसाठी सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलन पेटले असल्याचे दिसून येत आहे. सरकाने अनेक वेळा धनगर समाजाची फसवणूक केलेली असताना देखील होवू घातलेल्या उद्याच्या कॅबिनेटमध्ये आरक्षण अंमलबजाणीचा जिआर काढावा या मागणीसाठी बीड येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौकात सकल धनगर समाजाच्या वतीने ढोलबजाओ आंदोलन करण्यात आले.महाराष्ट्रातील धनगर

पान ३ वर



# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन ६८ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीन ६८वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला सकाळी ठिक ८.३०वा माजलगाव शहरातील डॉ आंबेडकर चौक या ठिकानी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन धम्मरॅली स सुरुवात करण्यात आली व सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते रॅलीचा समारोप करुण माजलगाव पोलीस स्टेशन शहर चे पोलीस निरिक्षक



आद.राहुलजी सुर्यतळ साहेब यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच धम्मप्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व चे संस्कार उपाध्यक्ष आद एस बी मोरे, अंबेजोगाई तालुका कोषाध्यक्ष आद भिमराव सिरसट हे होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध पान ३ वर

# मातंग समाजाच्या संघटनांची एकत्रित मोट बांधणार – वाघमारे

किल्लेधारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये फुले शाहू आंबेडकर आण्णाभाऊ साठे क्रांतिसूर्य लहुजी वस्ताद साळवे राष्ट्रवीर फकिरा साठे यांच्या नावाचा वापर करून स्वतःच्या कुटुंबाची खळगी भरणाऱ्या नेत्यांनी राज्यातील मातंग समाजाची दिशाभूल केली आहे यामुळे राज्यातील मातंग समाजाची सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या फसगत झाली आहे या सगळ्या गोष्टीवर मातंग समाजाची दशा बदलण्यासाठी आणि दिशा ठरवण्यासाठी राज्यातील मातंग समाजाच्या संघटनांची एकत्रित मोठ बांधणार असल्याची माहिती मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण वाघमारे यांनी सांगितले



ते म्हणाले की सध्या महाराष्ट्रामध्ये राजकीय फायद्यासाठी मातंग समाजाच्या कथीत नेतृत्वांची चढाओढ सुरू आहे मातंग समाजाचे अ ब क ड आरक्षण वर्गीकरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पान ३ वर

# डॉ.योगेश क्षीरसागरांकडून भाविकांसाठी अल्पोपहार



बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगड व शिरूर कासार तालुक्यातील नारायणगडावर दसरा मेळाव्यानिमित्त जाणाऱ्या भाविकांसाठी शहरानजिक असलेल्या सैनिकी विद्यालयासमोर मुख्य रोडलगत भाविकांसाठी स्टॉल उभारून अल्पोपहाराची सोय केली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर पुढाकारातून हे नियोजन केले आहे. सैनिकी विद्यालयासमोर स्टॉल उभारून दिवसभर अल्पोपहार, पाण्याची सोय केलेली आहे. या मार्गावरून भगवान भक्तीगड, नारायणगडावर जाणाऱ्या हजारो भाविकांनी अल्पोपहाराचा लाभ घेतला. दरम्यान, डॉ.क्षीरसागर यांच्या यंत्रणेकडून स्टॉल उभारून भाविकांची उत्तम सोय केली होती.

# रमेश आडसकरांनी विजयादशमी निमित्त दिल्या शुभेच्छा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील विधानसभा मतदार संघाचे नेते रमेशराव आडसकर यांनी दि १२ऑक्टोबर शनिवार रोजी विजयादशमी निमित्त माजलगाव शहरातील प्रतिष्ठीत व्याकती,राजकीय व्यापारी,डॉक्टर जेष्ठ नागरीक यांच्या निवासस्थानी जाऊन विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या व शुभ आशीर्वाद घेतले

माजलगाव विधानसभेचे नेते रमेशराव आडसकर यांनी दि १२ ऑक्टोबर शनिवार रोजी विजयादशमीच्या निमित्ताने शहरातील विविध मान्यवरांच्या भेटी घेत विजयादशमीच्या शुभेच्छा देत



अनेकांचे आशिर्वाद घेतले त्यामध्ये माजी आमदार मोहनराव सोळंके,माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,माजी आमदार डि.के.देशमुख,माजी नगराध्यक्ष अशोकराव होके पाटील,संपादक शिवाजी रांजवण,ज्येष्ठ नेते किसनराव नाईकनवरे, बाजार समितीचे माजी सभापती नितीनराव नाईकनवरे,संपादक गंमत भंडारी,नारायणराव डक,तुळजाभवानी अर्बनचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, बाजार समितीचे माजी उपसभापती निळकंठ भोसले, माजी नगरसेवक सतीश रांजवण पाटील,सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य दौलत खान,स्टेट बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त अधिकारी सुरेश भानप,डॉ.प्रशांत भानप,शहरातील प्रतिष्ठित उद्योजक गोविंद बजाज, शहरातील प्रतिष्ठित व्यापारी शशीकिरण गडम, मंगलनाथ बँके चे अध्यक्ष आर.जी.कानडे,माजी नगरसेवक नितीन मुंदडा, माजलगाव वकील संघाचे अध्यक्ष ऑड.बी.आर.डक, माजलगाव वकील संघाचे सदस्य ऑड विठ्ठलराव तिडके,माजी नगराध्यक्ष डॉ.अशोकराव तिडके, माजलगाव पान ३ वर

# आदिश्री ग्रुपची स्थापना नवरात्र उत्सवात विविध कार्यक्रम

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील महिलांनी एकत्र येऊन प्रत्येक महिलाच्या त्यांच्या तील कला गुणांचा वाव मिळून त्यांना स्टेज करेज मिळावे या साठी आदिश्री ग्रुप ची स्थापना करण्यात आली सदर आदिश्री ग्रुप ने नवरात्र उत्साहात डॉ भारती हावले यांच्या मार्गदर्शनाखाली या नवरात्र उत्साहात दांडिया कार्यक्रमा सह सुपर उमन सौंदर्य स्पर्धा होम मिनिस्टर सह सुगरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले तर या विजयी स्पर्धेकांना बक्षीस व भेट वस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला या दांडिया व



स्पर्धा कार्यक्रमात डॉ भारती हावले यांच्या सह ज्योती नायकवाडे.मोनिका हावले.शीतल नायकवाडे. रोहिणी नायकवाडे. संगीता बोबडे. नंदा औताडे. जयश्री गवळी. शिवकन्या नवसेकर.आरती चौधरी. सुनीता नाईकवाडे.जयमला गुंजाळ. दिव्या निनाळे.मंगल लोढा. यांच्या सह आदी महिलांनी भाग घेतला.




# विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही–दानवे

## * पण काम चांगले करा*आता काम कधी होणार

**जालना । प्रतिनिधी**

निधी कमी पडणार नाही हे सत्य आहे .पण काम चांगली करा असा आदेश संबंधित कॉन्ट्रॅक्टर यांना द्यावे असे सामान्य नागरिकाकडून बोलल्या जात आहे तसेच आता उद्घाटन झालेले काम कधी होणार असं हे चर्चा जालना शहरात सुरू आहे.जालना शहराच्या विकासासाठी राज्य व केंद्र शासनाकडून माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झालेला असून



शहरातील पूर्ण झालेल्या विविध विकसकामांचे आज दि. १२ ऑक्टोबर रोजी लोकार्पण करण्यात आले.

यावेळी मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून ''विशेष रस्ता योजना'' अंतर्गत काशी विश्वेश्वर मंदिर ते गोपीनाथ मुंढे चौकापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करण्यासाठी रु. २.०० कोटी, शिंदे बाल रुग्णालय ते कृष्णा ट्रॉली नवीन मोंढा पर्यंत रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी रु. २.०० कोटी, तसेच जालना म.न.पा. हद्दीतील सिंधी पंचायत वाडा ते जवाहर बाग पर्यंत अंडरग्राऊंड ड्रेनेज, लादीकरणासह सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रु. ३.०० कोटी, जालना म.न.पा. हद्दीतील जिजामाता प्रवेशद्वार ते बुंदीले चौकापर्यंत अंडरग्राऊंड ड्रेनेजसह लादीकरणासह सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रु. ४.०० कोटी, जालना नगर परिषद हद्दीतील नूतन वसाहत येथे श्री मगरे टेलर कॉम्प्लेक्स ते ओव्हर ब्रीज व्हाया भीमराज गेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत सी.सी. रस्ता तयार करण्यासाठी रु. ४.८२ कोटी

त्याचप्रमाणे जालना नगर परिषद अंतर्गत चमन ते स्वामी विवेकानंद पुतळयापर्यंत सिमेटरस्ता बांधकाम बांधकाम करण्यासाठी रु ६.०० कोटी, शहरातील चाटी गल्ली, फुल बाजार व कपडा बाजार येथे सि.सि. रोड, भुमीगत नाली व लादीकरण करण्यासाठी रु २.०० कोटी, पोलीस ट्राफिक ऑफिस ते देवचंद चत्रभुज पेट्रोल पंपापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करण्यासाठी रु २.०० कोटी

तसेच जालना म.न.पा. हद्दीतील शिंदे बालरुग्णालय ते बालाजी चौकापर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.१४ ऑक्टोबर २०२४ । पान ७

# किल्ले राजगडावर मधमाशांचा पर्यटकांवर हल्ला, पचवीस ते तीस पर्यटक किरकोळ जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

किल्ले राजगड (ता. राजगड) येथील बालेकिल्ल्याजवळ झालेल्या मधमाशांच्या हल्ल्यात पंचवीस ते तीस पर्यटक किरकोळ जखमी झाले तर बारामती मधील पर्यटकांमुळे तीन पर्यटकांना वेळीच मदत मिळल्याने त्यांचे प्राण वाचले.ही घटना रविवार (ता. १३) रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास किल्ले राजगडावर घडली.

जोडून आलेल्या सुट्ट्यामुळे किल्ले राजगडावर पर्यटकांची मोठी वर्दळ होती सकाळी साडेदहा ते अकरा वाजण्याच्या सुमारास बाले किल्ल्या जवळील असलेले मधमाशांचे पोळे उठल्याने येथील पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केला. यामध्ये सुमारे २५ ते ३० पर्यटक किरकोळ जखमी झाले. गडावरती एकच गोंधळ निर्माण झाला. यामध्ये



काही पर्यटकांनी स्वतःला वाचवण्यासाठी किल्ल्यावरती धावाधाव केली तर काही पर्यटकांनी गडावर असलेल्या पद्मावती तळ्यामध्ये उड्या घेतल्या. मधमाशांनी चावा घेतल्यामुळे गडावरील पर्यटकांची मोठी तारांबळ उडाली घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुरातत्व विभागाचे कर्मचारी बापू साबळे व विशाल पिलावरे यांनी पर्यटकांना सूचना करत काही पर्यटकांना पुरातत्व विभागाच्या कार्यालयामध्ये आसरा दिला. जीव वाचवण्याच्या आकांताने काही पर्यटन गडाच्या खाली पळाले त्यामध्ये मुंबईवरून आलेल्या तीन जणांच्या ग्रुपमधील प्रथम अहिरे (वय-२४) अंधेरी वेस्ट मुंबई या पर्यटकांना मोठ्या प्रमाणात मधमाशा चावल्याने तो जखमी झाला होता. तो ओरडत जीव वाचवण्यासाठी गड उतरू लागला. दरम्यान तो दोन ते तीन ठिकाणी तोल जाऊन घसरला किल्ला अर्धा उतरल्यानंतर त्याला उलटीचा त्रास होऊ लागला. व चक्कर येऊ लागली. दरम्यान गडावर जात असलेल्या बारामती येथील रणजीत बिचकुले, मारुती वाघमारे, योगेश मलगुंडे,अनिकेत मलगुंडे, स्वप्निल खरात या तरुणांनी घटनेचे गांभीर्य ओळखत गडावर न जाण्याचा निर्णय घेत प्रथम अहिरे व इतर गडावरून आलेल्या पर्यटकांच्या अंगावरील मधमाशांचे काटे काढून त्यांस पाणी दिले. व प्रथम अहिरे यास एकमेकांनी पकडून मदत करत गडावरून खाली आणून किल्ल्याच्या पायथ्याला असलेल्या साखर गावामध्ये खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यावेळी येथील प्राथमिक शिक्षक संतोष उत्तरकर यांनी त्यांना मदत केली. दरम्यान त्याच्यासोबत असणारे दोन पर्यटक विशाल गायकवाड व शुभम खरे दोघेही राहणार अंधेरी वेस्ट मुंबई यांनी मधमाशांपासून जीव वाचवण्यासाठी झाडांमध्ये उडी मारली असल्याची माहिती प्रथम अहिरे यांनी बारामतीतील पर्यटकांना दिल्यानंतर गडावरती संपर्क करण्यात आला. नंतर पुरातत्व विभागाचे बापू साबळे व पिलावरे यांनी गुंजवणे येथील पोलीस पाटील बाळासाहेब रसाळ यांच्याशी संपर्क केला रसाळ यांनी शांताराम उर्फ मंगेश भोसले यास गडाच्या दिशेने पाठवले. दरम्यान चोर दरवाज्याच्या दरीमध्ये विशाल गायकवाड व शुभम खरे अडकले होते त्यांना वर काढण्यात आले.

# बोपदेव घाटात तरुणीवर अत्याचार करणाऱ्यास १५ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी

**पुणे । प्रतिनिधी**

बोपदेव घाटातील सामुहिक बलात्कार प्रकरणातील २५ वर्षीय आरोपीला न्यायालयाने १५ ऑक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली. येवलेवाडी परिसरातून अटक केल्यानंतर कोंढवा पोलिसांनी त्याला शनिवारी (दि.१२) दुपारच्या सुमारास शिवाजीगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले. यावेळी, सहाय्यक सरकारी वकील विजयसिंह जाधव यांनी युक्तिवाद केला. ॲड. जाधव म्हणाले, आरोपींनी केलेला गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. अटक आरोपीची वैद्यकीय तपासणी करायची असून त्याचा डीएनए अहवाल प्राप्त करायचा आहे.

गुन्हयात वापरण्यात आलेले एक हत्यार तसेच वाहन जप्त करायचे आहे. गुन्ह्यादरम्यान आरोपींनी पिडीतांकडे असलेली चैन चोरली असून ती जप्त करायची आहे. आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्या अन्य साथीदार अद्याप फरार आहे. त्यांच्या ठावठिकाण्याच्या अनुषंगाने आरोपीकडे तपास करायचा असून त्यांना अटक करायची असल्याचे न्यायालयास सांगितले. न्यायालयाने सरकार पक्षाने केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपीला १५ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

# खंडणी मागणाऱ्या तोतया पत्रकारांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

पत्रकार असल्याचे बोगस ओळखपत्र दाखवून पिरंगुट (ता. मुळशी) येथील दुकानदाराकडे खंडणी मागणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील चार जणांना पौड पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून बोगस ओळखपत्र व एक मोटार जप्त केली आहे. हिमांशू दुबे, विजय झा, रोहीन केदारसिंग पटेल (सर्व रा. कळवा, ठाणे), जितेंद्र कमलाशंकर शर्मा (रा. नालासोपारा, ठाणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी इमामुद्दीन गफूर खान (वय ३४, रा. पिरंगुट, ता. मुळशी, मूळ रा. राजस्थान) याने फिर्याद दाखल केली आहे. शुक्रवारी (ता. ११) सकाळी सात ते दुपारी १२च्या कालावधीत ही घटना घडली.

पौड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इमामुद्दीन गफूर खान यांचे पिरंगुट कॅम्प भागात किराणा मालाचे दुकान आहे. शुक्रवारी सकाळी हिमांशू दुबे , जितेंद्र शर्मा, विजय झा व रोहीन पटेल यांनी खान यांच्या दुकानात प्रवेश केला. आम्ही ठाण्यातील कळवा येथील हमारा फाउंडेशनमधून आलो आहोत, असे त्यांनी खान यांना सांगितले. त्यांनी खान यांना पत्रकार व एनजीओची बोगस ओळखपत्रं दाखवून दुकानातील मालाची तपासणी करून त्यातील गुटख्याचा माल बाहेर काढला. आम्ही तुझी तक्रार पोलिस ठाण्यात करणार आहोत. तुझे दुकान सील करतो, तुला तुरुंगात पाठवतो, अशी भीती दाखविली. हे प्रकरण मिटवायचे असेल व पोलिसांत तक्रार करायची नसल्यास दहा लाखांच्या खंडणीची मागणी केली . त्यानंतर तडजोड करून त्यांनी खानकडे अडीच लाखांची खंडणी मागितली. याप्रकरणी खान याच्या फिर्यादीवरून पौड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# आणखी अकरा हजार वाहने रस्त्यावर!



**पुणे । प्रतिनिधी**

दसऱ्याच्या मुहुर्तावर घराच्या दारात आपल्या आवडीची गाडी पाहिजेच. यासाठी पुणेकरांची महिनाभर अधीच वाहन बुकिंगची गडबड सुरू होते. त्यामुळे यंदाच्या दसऱ्याला नव्याने १० हजार ६०१ वाहने आणि ३६३ ई-वाहनांच्या आरटीओकडे नोंदी झाल्या.

दरम्यान, गतवर्षीच्या तुलनेत यंदा वाहन खरेदी धिम्या गतीने दिसते. तर ई-वाहन खरेदी निम्म्याने कमी झाल्याचे दिसून येते. दसरा साडेतीन मुहुर्तापैकी एक, त्यामुळे यादिवशी सोने-चांदी, विविध वस्तू, कपडे यासह वाहन खरेदी तेजीत असते. दरवर्षी वाहन खरेदीची संख्या ही वाढलेलीच असल्याचे दिसून येते. यंदा दसऱ्याच्या मुहुर्तावर ६ हजार ७०७ दुचाकी तर २ हजार ९२२ चारचाकी वाहनांच्या नोंदी झाल्या. तसेच रिक्षा, बस, टॅक्सी आणि मालवाहतूक (गुड्स) वाहनांचीही मोठ्या प्रमाणात खरेदी झाल्याची माहिती पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून देण्यात आली.

# पुणे सराफ असोसिएशन अध्यक्षपदी फत्तेचंद रांका

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे सराफ असोसिएशनच्या अध्यक्षपदी फत्तेचंद नगराज रांका यांची आठव्यांदा फेरनिवड झाली आहे. याबरोबरच अभय गाडगीळ यांची उपाध्यक्ष, अमृतलाल मांगिलाल सोळंकी यांची सचिव, राजेंद्र सोमनाथ वाईकर यांची सह सचिव व कुमारपाल घिसुलाल सोळंकी यांची खजिनदारपदी बिनविरोध निवड झाली.



सराफ असोसिएशनची सर्वसाधारण सभेत ही निवड झाली. असोसिएशन येत्या १ जानेवारीला १०० व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्यामुळे या सभेला विशेष महत्त्व आहे. सभेच्या सुरुवातीला हॉलमार्किंग, जीएसटी, पी.एम.एल.ए. व एच.यू.आय.डी. या विषयांवर सेमिनार आयोजित केले होते. त्यामध्ये मुंबईचे तज्ज्ञ सीए भावीन मेहता यांनी मार्गदर्शन केले. नंतर सदस्यांना वेळोवेळी कायद्याची माहिती व्हावी, म्हणून संस्थेतर्फे सुवर्णपत्र' हे त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते. त्याचे संजय घोडावत ग्रुपचे चेअरमन संजय घोडावत यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. सुवर्णपत्राचे संपादक शैलेश रांका व सह-संपादक जयंत रणधीर आहेत. यावेळी घोडावत यांच्या हस्ते विविध पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशा ओसवाल व पुनम अष्टेकर यांनी केले. संपूर्ण बॅकस्टेजची जबाबदारी ममता बाठिया, दर्शना शाँड, राजेंद्र मेहता, योगेंद्र अष्टेकर व सोनी यांनी उत्कृष्टपणे पार पाडली.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सराफांचा सत्कार गोविंद उर्फ अजित विश्वनाथ गाडगीळ यांना पुणे सराफ जीवन गौरव पुरस्कार - २०२४ प्रदान करण्यात आला. ५० वर्षे जुनी प्रगतीशील पेढी या विभागात दिलीप सोनिगरा ज्वेलर्स व श्रीपाद शंकर नगरकर सराफ यांना पुरस्कार देण्यात आले.योगेंद्र डी. अष्टेकर व विशाल गणेश वर्मा यांना प्रगतिशील तरूण सराफ व्यावसायिक पुरस्कार तर शिवेंद्र ज्वेलर्स व मनिष ज्वेलर्स यांना प्रगतीशील होलसेल व्यापारी या श्रेणीतील पुरस्काराने या कार्यक्रमात गौरवण्यात आले.

# कोऱ्हाळे बुद्रुक येथे रस्त्याच्या प्रश्नासाठी सदस्याचा राजीनामा

**वडगाव निंबाळकर । प्रतिनिधी**

आमच्या परिसरातील नागरिकांच्या सार्वजनिक समस्या दूर व्हाव्यात. यासाठी ग्रामपंचायत सदस्य झालो, पण साधा आमच्या वस्तीकडे जाणारा रस्ताही करू शकलो नाही. अधिकाऱ्यांची आश्वासने भरपूर झाली. लोकप्रतिनिधींनी फक्त ऐकून घेतले. पण, कार्यवाही केली नाही. या सर्व प्रकाराला आता कंटाळून आपल्या ग्रामपंचायत सदस्यतेचा राजीनामा देऊन आमच्या भागात सर्व पक्षाच्या प्रचारासाठी बंदी करून मतदान न करण्याची भूमिका कोऱ्हाळे बुद्रुक (ता. बारामती) येथील सदस्य राजेंद्र पवार यांनी घेतली आहे.

येथील दलितवस्तीमधील रोहिदास नगरकडे जाणाऱ्या वहिवाटीच्या रस्त्यावर अडथळा निर्माण केला आहे. परिणामी सुमारे ३० कुटुंब असलेल्या वस्तीचा मार्ग बंद झाला आहे. पावसाळ्याच्या दिवसात या भागातील रहिवाशांच्या घराकडे वाहने जात नाहीत, चालत जाणे सुद्धा मुश्कील ठरते. आमच्यावर अन्याय सुरू आहे. यामुळे नगर भूमापन कार्यालयाकडे कागदपत्रांची मागणी करून पाहिले असता, हा रस्ता सिटीसर्व्हे नोंद असल्याचे दिसून आले. कायदेशीर रित्या तो खुला व्हावा, याबाबत ग्रामपंचायस्तरावरून पंचायत समिती बारामती यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. अधिकाऱ्यांच्या याबाबत बैठकाही झाल्या. १७ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेल्या बैठकीत रस्त्यावरील अतिक्रमण काढून खुला करण्याचे आश्वासन दिले. परंतु, ते पूर्ण झाले नाही. माझ्या भागातील रहिवाशांची अडचण पाहता याबाबत वेळोवेळी प्रशासनाकडे दाद मागितली. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांनी यावरून कोणताही तोडगा काढला नाही. सार्वजनिक समस्यांकडे लक्ष द्यायला तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांकडे वेळ नाही. यासाठी आमच्या परिसरातील सर्वांनी एकमुखी निर्णय घेऊन प्रचाराला बंदी केली आहे. माझी नैतिक जबाबदारी म्हणून मी माझ्या ग्रामपंचायत पदाचा राजीनामा दिला आहे, असे राजेंद्र पवार यांनी सांगितले. याबाबत ग्रामविकास अधिकारी राजेंद्र शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता संबंधित रस्त्याची मोजणीसाठी पैसे भरले आहे. यापूर्वी झालेले मोजणीबाबत आक्षेप आले होते. शासकीय पातळीवरून निधीही उपलब्ध झाला आहे. लवकरच प्रश्न मार्गी लागेल, यासाठी प्रयत्नशील आहोत. असे सांगण्यात आले.

# सूरज चव्हाणला अजित पवारांकडून मिळालं आयुष्यभर लक्षात राहील अस गिफ्ट

**पुणे । प्रतिनिधी**

बिग बॉस मराठी ५ चा विजेता सूरज चव्हाणचा सध्या सर्वत्र जोरदार चर्चा आहे. एका भेटीसाठी त्याचे फॅन्स दूरवरुन येत आहेत. त्याच्या घरी त्याच्या फॅन्सची रीघ लागली आहे. अशातच सूरज चव्हाणने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. अजित पवार यांनी सूरजचा सत्कार करत त्याचं स्वागत केलं. अजित पवार यांनी आपल्या बिझी शेड्युलमधून वेळ काढत सूरज चव्हाण सोबत बऱ्याच गप्पा मारल्या.

सूरज चव्हाणला गावी एक घर बांधायचं आहे, हे त्याने अनेकदा बोलून दाखवलं आहे. बिग बॉसच्या घरात असाताना देखील त्याने हे बोलून दाखवलं होतं. हीच गोष्ट लक्षात ठेवून अजित



पवार यांनी सूरज चव्हाणला घर बांधून देण्याच शब्द दिला आहे. अजित पवार यांनी केवळ शब्द दिला नाहीतर आपल्या कामच्या शैलीनुसार तिथूनच फोनाफोनी करत घर बांधण्यासाठीच्या हालचाली देखील सुरु केल्या आहे.


सूरज चव्हाणला याआधीच घरात लागणाऱ्या सर्व इलेक्ट्रॉनिक वस्तू त्याला ह्युंडाई कंपनीने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात एसी, फ्रिज, वॉशिंग मशिन, मोठा एलसीडी टीव्ही, याचा समावेश आहे. या सर्व वस्तू त्याच्या नव्या घरात ह्युंडाई कंपनी तर्फे देण्यात येणार आहेत. तळागाळातले तरूण आपल्या मेहनतीने पुढे येतात. राज्यात देशात आपली छाप पाडतात अशा तरूणांना ह्युंडाई कंपनी प्रोत्साहन देत असते. दरवर्षी अशा तरूणांची निवड केली जाते. त्यानंतर त्यांना हे बक्षिस दिले जाते. यावेळी कंपनीने सूरज चव्हाणची निवड केली आहे. त्याला आता या इलेक्ट्रॉनिक्स वस्तू भेट दिल्या जाणार आहेत.

सूरज चव्हाण याला ट्रॉफीसह १४.५० लाख रुपये मिळाले. सोबतच इलेक्ट्रिक स्कूटर आणि १० लाखांचं ज्वेलरी वाऊचरही मिळाले होते. सूरज चव्हाण याला बिग बॉस मराठी सीजन ५ मधून एकूण २४.६ लाख रुपये मिळाले. तर कोई मोई डॉट कॉमच्या रिपोर्टनुसार, त्याला दर आठवड्याला २५ हजार रुपये मिळाले होते. अंतिम आठवड्यापर्यंत त्याची एकूण किंमत २.५ लाखांपर्यंत जाते.

# दसऱ्यानिमित्त महालक्ष्मी देवीला १७ किलो सोन्याची साडी

**पुणे । प्रतिनिधी**

विजयादशमीनिमित्त पुण्यातील सारसबाग परिसरातील श्री महालक्ष्मी मंदिरातील देवीच्या मूर्तीला तब्बल १७ किलो सोन्याची साडी परिधान करण्यात आली आहे. देवीला ही साडी परिधान करण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून आहे. देवीला परिधान केलेली ही सोन्याची साडी दक्षिण भारतातील कारागिरांनी तयार केलेली आहे. २१ वर्षांपूर्वी देवीच्या मुर्तीसाठी ही सोन्याची साडी तयार करण्यात आली होती. अनेक कारागिरांनी जवळपास सहा महिने ही साडी तयार करण्याचे काम केले होते. त्यानंतर ही साडी पूर्ण झाली आहे.



महालक्ष्मी देवीसाठी एका भक्ताने ही साडी अर्पण केली आहे. वर्षभरातून दोन वेळेस म्हणजे दसरा आणि लक्ष्मीपूजनाच्या दिवशी ही साडी देवीला नेसवली जाते. देवीचे हे सुवर्णवस्त्रातील रुप पाहण्याकरीता भाविकांची चांगलीच गर्दी होते. साडीवर आकर्षक अशा प्रकरचं नक्षीकाम करण्यात आलेलं आहे. १७ किलो सोन्याची साडी परिधान केलेले श्री महालक्ष्मी देवीचे दर्शन घेण्यासाठी आणि देव देवीला पाहण्यासाठी भक्तांकडून दरवर्षी गर्दी केली जाते. यावर्षी दसऱ्यानिमित्त सकाळपासून अनेक भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. स्वारगेट परिसरातील सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिराची निर्मिती १९८४ मध्ये करण्यात आली होती. मंदिरात मनमोहक श्री महासरस्वती, श्री महालक्ष्मी आणि श्री महाकाली देवीची मूर्ती आहे. आज विजयादशमीनिमित्त भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी गर्दी केली आहे. देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी सकाळच्या सुमारास गर्दी केली आहे. वर्षभरातून केवळ दोन वेळा देवीला ही सोन्याची साडी परिधान करण्यात येते. दसरा आणि लक्ष्मीपूजनाच्या दिवशी ही साडी देवीला परिधान करतात. त्यामुळे श्री महालक्ष्मी देवीचे हे सुवर्णवस्त्रातील रुप पाहण्याकरीता देवीभक्तांनी गर्दी केली.

# देहूरोड येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण



**पुणे । प्रतिनिधी**

आमदार सुनील शेळके यांनी त्यांच्या कार्यकाळात आजपर्यंतचा सर्वाधिक म्हणजे सुमारे अडीच कोटींचा विकास निधी उपलब्ध करून दिल्याने झेंडे मळ्यातील अनेक प्रलंबित विकास कामे मार्गी लागली आहेत, अशी प्रतिक्रिया देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डचे माजी उपाध्यक्ष प्रवीण झेंडे यांनी दिली.देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील झेंडेमळा येथील विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते (बुधवारी, दि.९) झाले. यावेळी ते बोलत होते. प्रवीण झेंडे म्हणाले की, कॅन्टोन्मेंटच्या हद्दीत असलेला आमचा झेंडेमळा विकासापासून वंचित होता. बोर्डाकडून मिळणारा निधी अल्प प्रमाणात असल्यामुळे कामे करताना अडचणी येत असत. रस्त्यासारख्या मुलभुत सुविधेसाठी आम्हाला संघर्ष करावा लागला, परंतु आमदारांनी अडीच कोटी इतका भरीव विकासनिधी दिल्याने झेंडे मळ्यातील सर्व नागरिक आमदार सुनील शेळके यांच्या कामावर नक्कीच समाधानी आहेत.

झेंडे मळ्याप्रमाणेच देहूरोड परिसरातील विविध भागांमध्ये आमदार शेळके यांनी विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण केले.

# मतदार जनजागृतीसाठी शिरूर मध्ये विविध उपक्रम

**शिरूर । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरूर शहर आणि तालुक्यातील मतदारांमध्ये मतदार जनजागृती करण्यासाठी तालुका प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले. यामध्ये मतदान जनजागृती रॅली, कार्यशाळा, पथनाट्य आणि विद्यार्थ्यांच्या निबंध व चित्रकला स्पर्धांचा समावेश आहे.




शिरूर विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्याधिकारी प्रितम पाटील, निवडणूक नायब तहसीलदार सुजाता बाराहाते, शिरूर नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी राहुल पिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयांचे प्राचार्य, शाळांचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, बी. एल. ओ. आदींनी मतदार जनजागृती मोहिमेत सहभाग घेतला.

सी. टी. बोरा कॉलेज, विजय माला जुनियर कॉलेज ऑफ सायन्स, सिताबाई थिटे महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल व विद्याधाम प्रशाला या ठिकाणी मतदान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण मतदार संघातील विविध ठिकाणी या बाबत प्रात्याक्षीक करून जनजागृती करण्यात आली. शिरूर शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या मैदानावर महिलांसाठी विशेष मतदार जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच १९८ मतदार संघातील विविध ठिकाणी महिलां मतदार नोंदणी करिता, दिव्यांग मतदार नोंदणी करिता व नव मतदार नोंदणी करिता, अनुसूचित जमाती करिता नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. मतदार जनजागृती कार्यक्रमामध्ये सर्व नागरिकांनी सहभागी होऊन लोकशाही बळकट करण्यासाठी व मतदानाची टक्केवारी वाढवावी, तसेच ज्या नागरिकांचे नाव मतदार यादीत नसेल किंवा दुरुस्ती करावयाची असेल त्यांनी आपले भागातील बी. एल. ओ. यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन १९८- शिरूर विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्याधिकारी प्रितम पाटील यांनी केले.

cmyk